VERSES DURING Lockdown



Chief Editor: Dr. P. K. U. Pillai

EDITORS

- Girish Sapate
- Ravindra Pantavane
- Sawan Dharmpuriwar.

VERSES DURING

LOCKDOWN

(A Collection of Selected Poems from the National Poetry Competition 'Express In Verse' Organised by IQAC and Dept. of Marathi & English, Vidyasagar Kala Mahavidyalaya, Khairi (Bijewada), Ramtek during Lockdown Period)

Chief Editor

Dr. P.K.U. Pillai

Editors

Girish Sapate **Ravindra Pantavane** **Sawan Dharmpuriwar**

आकार पब्लिकेशन
महाल, नागपूर

978-81-944165-4-8



VERSES DURING LOCKDOWN

ISBN: 978-81-944165-4-8

Copyright © 2020
The Principal,
Vidyasagar Kala Mahavidyalaya,
Khairi (Bijewada), Ramtek.

E-book created in India by:
AAKAR PUBLICATIONS, NAGPUR

First edition:
June, 2020

Price:
Rs. 200/-

All rights reserved. No part of this publication may be reproduced, distributed, or transmitted in any form or by any means, including photocopying, recording or other electronic or mechanical methods, without the prior written permission of the publisher, except in the case of brief quotations embodied in critical reviews and certain other non-commercial uses permitted by copyright law. For permission requests, write to the publisher, addressed "Attention: Permissions Coordinator," at The Principal, Vidyasagar Kala Mahavidyalaya, Khairi (Bijewada), Ramtek.

Cover Design:
Kamesh Patle, Bhandara

Drawings:
C. D. Shivankar,
Pushpa Chaure, Shraddha Raut

The poems contributed by authors are their own creations. It is understood that the same have been processed through plagiarism. Minimum intervention has been done by the Editors of this book and they are not responsible for any occurrence within the terms of plagiarism.

Vidyasagar Shikshan Sanstha, Ramtek

Vidyasagar Kala Mahavidyalaya

Khairi (Bijewada), Ramtek, Dist. - Nagpur, 441106

Accredited with Grade 'B' by NAAC

AN IQAC INITIATIVE

An Awareness Campaign to Fight
COVID 19 Pandemic

VERSES DURING

LOCKDOWN

COLLECTION OF SELECTED POEMS FROM

National Poetry Competition

Express in Verse

**ORGANIZED JOINTLY BY IQAC &
DEPARTMENT OF MARATHI &
DEPARTMENT OF ENGLISH**



DEDICATED TO

ALL THE CORONA WARRIORS

FIGHITING TO

SAVE THE HUMANITY

FROM THE

COVID 19 PANDEMIC

ॲड. आशिष जयस्वाल

आमदार- रामटेक विधानसभा क्षेत्र

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ (राज्यमंत्री दर्जा)

MESSAGE

It is a matter of great pleasure that A National Level Poetry Competition 'Express in Verse' on the topic 'Emotions during Corona Outbreak and Lockdown' was jointly organised by IQAC and Dept. of Marathi & English of Vidyasagar Kala Mahavidyalaya, Khairi (Bijewada), Ramtek as an awareness campaign to fight COVID 19 Pandemic. The selected poems from the competition are also being published in the form of an e-book with ISBN entitled "Verses during Lockdown". The theme of the competition and e-book is significant in the present scenario when the whole world is witnessing an unprecedented crisis due to the pandemic.

I congratulate the organizers for this endeavour and extend my warm greetings to the participants in the competition and contributors to the e-book. I hope that such type of activities will prove to be a great mental booster to everyone in the society and provide an opportunity to create positivity in life during such difficult times.

Adv. Ashish Jaiswal
M.L.A. Ramtek
President,
Vidyasagar Education Society

निवास : राजाजी वार्ड, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर
फोन : (०७१९४) २५५३८८, मो. : ९८८१७७१३१३८

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित (महाराष्ट्र शासन उपक्रम)
७, अजनी चौक, वर्धा रोड, नागपूर - ४४००१५ (महा.) फोन (०७१२) २५५३२०९ फॅक्स : २५५३२०

Smt. Anita V. Jaiswal
Secretary, Vidyasagar Education Society, Ramtek

MESSAGE

I'm pleased to know that as an IQAC initiative to create awareness against COVID 19 Pandemic, IQAC, Department of Marathi & English of Vidyasagar Kala Mahavidyalaya have jointly organised a National level Poetry Competition 'Express in Verse' on the topic 'Emotions during Corona Outbreak and Lockdown'. It is also a matter of pleasure that the college is publishing selected poems in the form of an e-book with ISBN, entitled "Verses during Lockdown".

The theme of this activity and e-book is relevant in the present context. The present venture will create lot of awareness and positivity during this pandemic time.

I extend my warm greetings to the participants in the competition, contributors to the e-book and congratulate the organizers and wish this venture all success.

A J Jaiswal

Anita Jaiswal
Secretary
Vidyasagar Education Society, Ramtek

Dr. P.K.U. Pillai
Chief-Editor

FOREWORD

The COVID-19 pandemic has created an unprecedented crisis in the history of mankind. All possible human enterprises came to a standstill. The nation was forced to a complete lockdown. Only one thing could not be stopped by the deadly corona virus. And that was the unstoppable human creativity. And the best and noblest form of this creativity is poetry.

During the Lockdown, the IQAC of Vidyasagar Kala Mahavidyalaya in collaboration with the Dept. of English and Marathi launched an ambitious on-line project of a national poetry competition. The best minds across India responded. A total of 210 poems were received in three languages-Marathi, Hindi and English. The poems were scrutinized and the best three were selected and awarded prizes. The IQAC ventured to publish the best 66 poems and the e-book of poems in your hands is the end product of this venture. I sincerely hope that this collection of poems will be the best expression of how creative minds responded to the worst ever tragedy - the COVID-19 pandemic- that the human race has faced in its long and chequered history.

Best Wishes to all.

Dr. P.K.U. Pillai

Principal



VERSES DURING LOCKDOWN

EDITORIAL

COVID 19 pandemic is teaching multiple lessons to the world. A virus, invisible to our naked eyes, has proved that it can lockdown our lives all of a sudden. Corona threat is proving disastrous for all of us. It has given a major setback to economy, industry, education and other such sectors worldwide. It has compelled us to lockdown ourselves into our homes to remain safe from getting infected with corona virus. Number of corona cases and casualties caused by it are still increasing and the whole world is struggling to fight and cope with the situation. It has given birth to a lot of social, economic, political and psychological issues.

The greatest issue today is to cope up with the emotional and crisis created due to the corona pandemic. On the one hand, the people are locked down in their houses, and on the other, they are worried about their daily bread and butter. Remaining within the four walls for such a long period has also given birth to various mental pressures and psychological issues. Besides this, has also provided us with an opportunity to introspect as well as retrospect ourselves and think about the various ways of life. Taking note of this, IQAC of our college in collaboration with Department of Marathi and English took initiative to organize National Poetry Competition 'Express in Verse' to give an opportunity to the people to unlock their overflowing emotions during the lockdown period and weave them into verses.

We got overwhelming response from all over India. We received 210 poems for the competition from various states in India. Among these, 149 poems were in Marathi, 46 poems were in Hindi and remaining 15 poems were in English. These poems mainly dealt with the various emotions, sense and sensibilities during lockdown period and effect of Corona pandemic on human life. It was a tough job for the judges to select three best poems to give away the prizes. We have tried our best to choose the best poetic expressions in the competition. We congratulate Shri Vinod Raut, Shri Kamesh Patle and Shri Balawant Bhoyar for winning prizes in the competition. We are grateful to all the participants who have sent their compositions for the competition, without which the competition wouldn't have been a grand success.

IQAC of the college took initiative to publish the best poems received in the form of e-book with ISBN. Principal Dr. P.K.U. Pillai a positive nod in this direction. We express our sincere thanks to Shri C. D. Shiwankar, of Aakar Publications, Nagpur for publishing this e-book entitled 'Verses during Lockdown'. We are also grateful to Shri Kamesh Patle for giving this book a beautiful cover which reflects the content of this book in true sense. We are also obliged to all the contributors.

We would be failing in our duty if we do not acknowledge the motivation, dedication and support of the people who stood by us to make this endeavour memorable. We take this opportunity to convey our heartfelt thanks to Hon'ble Shri Ashish Jaiswal, President V.E.S., Hon'ble Smt Anita Jaiswal, Secretary, V.E.S. and all the Hon'ble members of the Management of Vidyasagar Education society, Ramtek for their support. We thank our Principal Dr. P.K.U. Pillai for his motivation, guidance and unconditional support in organising this activity and publishing this e-book. We are also thankful to all the members of IQAC for their valuable guidance. We express our heartfelt gratitude to all our teaching and non-teaching staff members for their support in making this activity a grand success.

Girish Sapate
(Head, Dept. of Marathi)

Ravindra Pantavane
(Dept. of English)

Sawan Dharmpuriwar
(IQAC Co-ordinator)

CONTENTS

पुरस्कार प्राप्त कविता 1-6

1. **एयरपोर्टच्या दिशेने** ✍ विनोद राऊत 2
2. **मैं मजदूर, मजबूर भी हूँ...** ✍ कामेश पटले 4
3. **नव्या संघर्षाची कविता घेऊन** ✍ बळवंत भोयर 6

मराठी विभाग 7-59

1. **कोरोना** ✍ मीनाज पौचातोड़ 8
2. **ही निघाली जिंदगानी** ✍ प्रकाश कांबळे 9
3. **पिंजरा** ✍ माला पारधी 10
4. **कोरोनायन** ✍ मनोहर नाईक 11
5. **कारोनाचे वादळ** ✍ अनुराधा मजुमदार 15
6. **माझी प्रार्थना** ✍ विलास गजबे 16
7. **वाहाडला लॉकडाउन** ✍ प्रशांत जांभुळकर 17
8. **मोकळा श्वास** ✍ पवन कामडी 'प्रीत' 19
9. **युद्ध मानवाचे** ✍ गणेश पांडे 20
10. **राहूनच गेलं** ✍ प्राजक्ता दाणी 21
11. **कामगार बोलतो** ✍ वेणूप्रशांत 22
12. **हद्दपार करू महामारी** ✍वर्षा गंगणे 23
13. **विस्तवाचे वास्तव** ✍विशाखा कांबळे 24
14. **सारं कसं शांत शांत** ✍जयश्री जोशी 25
15. **वेड्या माणसा** ✍ निर्मिती देवलसी 26
16. **लेक म्हणाली** ✍ शरद शहारे 27
17. **इतिश्री कोरोनाची** ✍प्रतिभा बिलगी 'प्रिती' 28
18. **कोरोना काळातील संवेदना** ✍ शिल्पा ढोमणे 29
19. **कोरोनाचं महाभारत** ✍ वर्षा किडे 'कुलकर्णी' 30
20. **सुसंवाद** ✍ मंजुश्री वाळुंज 31
21. **संवेदना** ✍ प्रदीप फणसे 33
22. **हे देशा** ✍ अश्विन खांडेकर 34

23. बाकी हयात आहे	✍ अनिल पाटील	35
24. अतुल्य भारत	✍ प्रदिप सोमकुंवर	36
25. जिंदगी	✍ अर्पित कापसे	38
26. कसं सांगू	✍ विलास डोईफोडे	39
27. तू रक्षणकर्ता	✍मंगेश दौडकर	40
28. चंचल मन	✍ उषा ठाकरे	41
29. ठेव थोडं त्यांच्यासाठी	✍ दीपक उपाध्ये	42
30. मुक्ती देशील का?	✍ किमया तेंडूलकर	44
31. कोरोना जागृति अभंग	✍ सुचिता कराळे	45
32. कसा येऊ रे...	✍ बाबाराव निमजे	46
33. कधी वाटलं होतं का?	✍ अनिका उपाध्ये	47
34. सांग तयांना कसे मी विसरू?	✍ लीलाधर दवंडे	48
35. पावलं	✍ श्रुति भामरे	49
36. जगणे नटून गेले	✍ उल्हास डांगोरे	50
37. जिथं-तिथं, जिथं-तिथं, धसलाय कोरोना	✍ राजकुमार कुंभारे	51
38. आले कसे विषारी	✍ विष्णू सोळंके	53
39. कोरोना काळातील संवेदना	✍ हर्षदा सुंठणकर	54
40. अजूनही मानवता शिल्लक आहे	✍ प्रतिक मुंजेवार	56
41. जरा जपून वागा	✍ शितल गोविंदवार	57
42. स्थलांतरित	✍ संतोष डाखरे	58
43. लढा	✍ कमलेश सोनकुसळे	59

हिन्दी विभाग 60-78

1. लॉकडाउन	✍ सविता देवगीरकर	61
2. कौन रखे हिसाब?	✍ नरेंद्र गाडगे	63
3. कटिबद्ध हैं हम	✍ आरती कुलकर्णी	64
4. द्वंद्व	✍ सिद्धार्थ स्वर्णकार	66
5. हम खड़े है अभी ढले नहीं	✍ गजानन देशमुख	67
6. विरासत	✍ पूजा उजवणे	68

7. **कोरोना: एक परिवर्तीत दृष्टीकोण** ✍ ऋषिकुमार अग्रवाल 69
8. **ना हो तु करोना से निराश** ✍ संजय जोशी 71
9. **एक आस** ✍ वेदश्री बारोकर 73
10. **एक प्याली चाय** ✍ कस्तुरी दाणी 75
11. **है सामना** ✍ कार्तिक तिवारी 76
12. **मैं मज़दूर हूँ** ✍ चिन्मय गोतमारे 77

English Section 79-85

1. **Emotions during Corona Outbreak** ✍ Litty Curian 80
2. **King Corona! King Corona!** ✍ Shravani Surve 81
3. **Sensation of Lockdown** ✍ Suprit Bagawale 82
4. **Meet me in the Ordinary** ✍ Diksha Gurbaxani 83
5. **Corona A New Dawn** ✍ Rima Thakur 84
6. **Pandemic** ✍ Hritika Hisariya 85

आणखी काही कविता 86-94

1. **बहिष्कार** ✍ सुरेश सोमकुंवर 87
2. **खेळ** ✍ भावना देशभ्रतार धडाडे 88
3. **चला निघूया आपल्या गावास** ✍ रवींद्र पानतावणे 89
4. **कोरोना काळातील नोंदी** ✍ सावन धर्मपुरीवार 90
5. **कंटाळवाण्या एकांतवासात** ✍ गिरीश सपाटे 94



पुरस्कार प्राप्त कविता

(प्रथम पुरस्कार प्राप्त कविता)

एयरपोर्टच्या दिशेने

१.

लॉकडाउन मधली पहिली सकाळ...
उगाचच आवडता व्यक्ती निघून जावा आयुष्यातून
तसे उदास झालेयत
मॉर्निंग वॉकचे झुंबड उडणारे रस्ते...
कर्फ्यू लागल्यागत अबोल झालेल्या
या वसाहती...
पिंडदान केलेल्या मानसांसारखी
ही निश्चेष्ट झालेली घरे...
सोशल डिस्टेंन्सिगचे भान ठेवत
मी पाहतोय
गॅलरीतून पलिकडचा भवताल...

२.

तसे कधीचेच दूर झालेले आपले
आवडते रस्ते
विलगीकरणाची संध्याकाळ हातावर
ठेऊन दूर गेलेत
अलगतपणे...
कुठलाच त्रागा न करता
किती असोशिने जपलेस तू
सोशल डिस्टेन्स...!
तुला ठाऊकंय?
आपल्या आवडत्या रस्त्यावर
आवडीने लावलेला गुलमोहर
अजूनही
बहरतो म्हणतात...

३.

बाभळीच्या झाडाखाली
सांडलेलं ऊन
अंगावर घेत
थांबल्यायत दोन कष्टकरी स्त्रीया
डोक्यावरच्या मोळीसोबत
सांडलेल्या उन्हाचे कवडसे घेऊन
त्या टिपून काढतायत
अंगावरचा घाम

हॉस्पिटल मधून परतणारी नर्स
बिन चेहऱ्याची दुपार घेऊन
चाललीय घराकडे....
मी पहतोय गॅलरीतून
अवेळीच भरून आलेल्या आभाळाकडे...

४.
कलती दुपार डोळ्यात साठवून
मी उभा आहे
आपल्याच गॅलरीच्या अवकाशात
आत... खूप... आत उतरत
चाललाय पलिकडचा भवताल....

५.
ग्लोबलाइजेशनचं डांबर
वितळलेल्या रस्त्यावरुन
बिसलेरीची रिकामी बॉटल
धबढब वाजवत
चाललेलं नागडं पोर...

६.
सायरन वाजवत निघालेली
पोलिसांची गाडी थांबत नाही
त्याच्या जवळ.
की विचारात नाही
त्याला कुठलेच प्रश्न
मागत नाही त्याला त्याची आइडेंटिटी
ती धावतेय एयरपोर्टच्या दिशेने...

✍ **विनोद राऊत**

(द्वितीय पुरस्कार प्राप्त रचना)

मैं मजदूर, मजबूर भी हूँ...।

पेट की भूख मिटाने शहर आया था.
अब उसी भूख से बिलखता गांव की आस लिया,
सड़क पर पैदल चल रहा.
मैं आत्मनिर्भर हूँ.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

दिनों से दबा रखा था अपनी तड़पन को,
पर बढ़ते तालाबंदी के आगे उम्मीद ने दम तोड़ दिया.
कोरोना तो इसी साल की उपजी बीमारी है साहब
पर मैं तो सदियों का ही
गरीबी से बीमार हूँ.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

सरकारी फरमान निकला है मदत मिलेगी,
राशन मिलेगा,
जहां हो वही रहना..।
पर कैसे रहे..?
महज राशन से चूल्हा थोड़े ही जलता है !
मोफत राशन की चाह छोड़
मैं गांव की राह में निकला,
रेल की पटरी पर चकनाचूर भी हूँ.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

किलो भर राशन के बहाने फ़ोटो खिंचवाकर
मेरे गरीबी का मजाक बनाते हो,
बिना चप्पल के सड़क नापते मेरे छिले हुए पाव छपवाकर,
अपनी झूठी संवेदना दिखाते हो,
तो कभी कलम की ताकत कहकर,
मुझपर झूठे आंसू भी लिखवाते हो!
चलो इसी बहाने देश मे कमसे-कम,
मैं मशहूर हूँ?
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

मैं बिना छत के तुम्हारे लिए
घर आलीशान बनवाते रहा,
परिवार को नंगा छोड़ तुम्हारे लिए कपडे सिलवाते रहा,
रोज दो रोटी के लिए मरता

तुम्हारे सालभर का इंतजाम करता रहा
लेकिन,
हमेशा दुसरो के लिए जीने की इसकदर सजा पा रहा,
मैं बेकसूर भी हु.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ..

अच्छा हुआ इस महामारी ने
औकात बता दी मेरी.
की मैं तुम्हारे पावतले रौंदता- कुचलता कीड़ा हु!
मेरे लिए झगड़ते-झगड़ते
तुम राजा बन गए,
पर मैं आज भी तुम्हारे राजनीती की बली चढता
शिकार ही हूँ.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

बीस लाख करोड़ घर में
किस-किस को दोगे साहब.
मैं तो अब भी चल रहा सड़क पर हूँ!
पैकेज भले बाद में दे देना,
एक 'बस' का ही इंतजाम कर दो मालिक
मैं आज भी उसी के इंतजार में हूँ.
मैं मजदूर, मजबूर भी हूँ.

✍ **कामेश पटले**

(तृतीय पुरस्कार प्राप्त कविता)

नव्या संघर्षाची कविता घेऊन

डोक्यावर घर घेऊन चालताना
तिचे डोळे विसरत नाहीत गांव
कमानीच्या टोकाला बांधलेले कुंकवाच नशीब
पावसाळी दिवसाच्या गर्द आठवणी पेरत जातय
आता काळ बदलत चाललाय
सखे, तुझ्या माझ्या स्पर्शरूपी बंदचे अंतर निर्माण होताहेत
वैश्विक महामारीच्या संवेदनशील काळात
तुझी भेट नाही
तुझ्या आठवणीचा परामर्श मात्र तेवढा
सर्वत्र अस्पष्टता, नकारात्मकता
अशाप्रसंगी तुझे असणे
या देहभान स्थितीत असताना
तुझ्या मनाच्या खोल तळाशी
लॉकडाउनच्या काळातील तुझे
प्रेम संवाद कसा विसरू
सखे, मला संवाद करावासा वाटतो निरंतर
जगणे सोपे करण्यासाठी
नाकारलेले कोरडे हुंदके
याच मातीत विरत जातात
तुझ्या प्रत्येक शब्दाची स्पष्टता हवी
काळजाच्या देठातून अंकुरत जाते एक दिव्याची माळ
तुझ्या पदराच्या गाठीत उजेड बांधताना
आता सर्वत्र काळोखाचा प्रदेश दिसतोय
कोरोनाच्या या राज्यात
प्रकाशाचे सूत्र समोर ठेवताना
सखे, आता आपण नव्या जीवनशैलीचा अभ्यास करूया
या भय राज्यात..
नव्या युगाची निर्मिती करण्यासाठी
माझ्या देशाचे अस्तित्व कायम करण्यास्तव
सारे आपण जगूया
नव्या संघर्षाची कविता घेऊन...

✍ **बळवंत भोयर**

मराठी कविता

कोरोना

किती अजागळ क्रूर कोरोना घालीत थैमान.
दिसेच मृत्यु पदोपदी अन् थरथरला प्राण.

बंद कवाडे खिडक्या द्वारे निर्जन झाल्या वाटा,
अंगावरती विषन्नतेचा उभा राहिला काटा.

आहे आता हवेत विषही सावधता मोठी,
कुणी न रक्षक आज कुणाचा शब्द गाठले ओठी.

काय करुणता ढाळीत अश्रू प्रेतांची रास,
हरवून बसले जगणे येथे तुटलेले श्वास.

भयभीत आणि सैरावैरा हतबल प्रत्येक,
दाही दिशांना हलवून जातो प्राणांतीक शोक.

गळून पडली सारी अहंता मनुजाची थोर,
सुक्ष्म विषाणु कसा लावितो आज जिवाला घोर.

राखून अंतर दुर जरी मी होतो एकांत,
लक्ष जिवाची अथक वेदना उठते हृदयात.

✍ **मीनाज पौचातोड़**

ही निघाली जिंदगानी

ही निघाली जिंदगानी, रस्त्यावरी गड्यांनो,
चेतवोनी काळजाला विस्त्यावरी गड्यांनो.
भाकरीसाठी तरसतो हा कामगार बंधू,
राहिला न भरवसा त्या खुर्च्यावरी गड्यांनो.
"जा, निघा गावास अपुल्या" आदेश शासनाचा,
पोलिसी दंडे बरसले जत्थ्यावरी गड्यांनो.
हाक दिधली घरकुलाने, "ये लेकरा परत तू",
हाय! जाते प्रेत तेथे, वस्त्यावरी गड्यांनो.
पहुडला थकवा जरासा रेल्वे रुळाकडेला,
मृत्यु होता त्याचवेळी गस्त्यावरी गड्यांनो.
एकलव्या! तू कितीदा येशी परत नव्याने,
प्रश्न भारी शिक्षणाचा बस्त्यावरी गड्यांनो.
चालने नाही तुझ्याविन उद्योग कारखाने,
बघ 'उणे' चे चिन्ह बसले गल्ल्यावरी गड्यांनो.
तोलले तू मनगटावर पृथ्वीस कामगारा,
थांबली रे अर्थक्रांति अर्ध्यावरी गड्यांनो.

✍ **प्रकाश कांबळे**

पिंजरा

माणसाला हौस होती
पिंजऱ्यातले पक्षी घरी घेऊन येण्याची
विरंगुला म्हणून.
आपल्या आनंदाच्या धुंदीत
त्याला दिसत नव्हती पिंजऱ्यामागची
ती केविलवाणी नजर.
एरव्ही अवघे आकाश मुठीत घेऊन
उडणारे पक्षी,
पिंजऱ्यात राहून मनमौजी माणसाला
शह देण्याची करणार कशी हिंमत?
आज पक्ष्यांची जागा माणसाने घेतलीय.
पिंजऱ्यामागून पाहतोय तो स्वछंदपणे
आकाशात उडणारे पक्षी.
हळूच खिडकीतून डोकावतांना पक्षी पाहताहेत,
पिंजऱ्यातल्या माणसाची केविलवाणी नजर.
अन् एकच किलबिलाट करून उठताहेत.
अरे माणसा ! आज तरी कळली का तुला
स्वातंत्र्याची किंमत?

✍ **माला पारधी**

कोरोनायन

कोरोना नामक
संकट हे आले
भयभीत झाले विश्व सारे.

संकटाची छाया
विश्वव्यापी झाली
मने धास्तावली कोरोनाने.

मृत्यूच्या भयाने
आक्रसले विश्व
स्पर्धातूर अश्व जेरबंद.

मृत्यूचे स्वरुप
ऐसे भयप्रद
मृत्यूही गारद भयापुढे.

गतीमान विश्व
ऐसे ठप्प झाले
जणू बिघडले विश्वाचे घड्याळ.

चीन देशातील
शहर वूहान
आहे जन्मस्थान कोरोनाचे.

चीनची अभेद्य
भिंत ओलांडली
दाणादाण केली कोरोनाने.

अवघ्या विश्वात
मृत्यूचे थैमान
महासत्ता मौन मृत्यूपुढे.

कोरोनाचे क्रौर्य
जगभर गेले
जग जागे झाले लढ्यासाठी.

कोरोनाने जेव्हा
आवळला फास
गुदमरे श्वास सामान्यांचा.

टाळेबंदी मुळे

काम-धंदा गेला
कोंडमारा झाला जगण्याचा.

जयांचे आहे पोट
तळहातावर
ते सारे बेजार भुकेमुळे.

कष्टावर ज्यांची
रोज पेटे चूल
त्यांचे झाले हाल जीवघेणे.

कामगार वर्ग
देशाचा आधार
तोच निराधार संकटात.

भक्त सापडला
महा संकटात
देव कुलुपात बंद झाला.

कोरोना विषाणू
अती सूक्ष्म आहे
विश्व गिळू पाहे संसर्गाने.

पोटासाठी जो-जो
जिथे-जिथे गेला
तिथेच अडकला संकटात.

भुकेलेले पक्षी
रानोमाळ झाले
जाळ्यात फसले कोरोनाच्या.

शंकेचे वादळ
उठले अंतरी
सारे अधांतरी भवितव्य.

शहरात नाही
कुणाचा आधार
कष्टाची भाकर बंद झाली.

उडणारे पक्षी
नभात घायाळ
कैसे हे वादळ कोरोनाचे.

घायाळ पक्ष्यांना
घरटयाची ओढ
स्वप्नातले झाड खुणावते.

गावाला जाण्यास
अधीर ही मने
जाण्याची साधने ठप्प झाली.

रेल्वे, बस, सर्व
मार्ग बंद झाले
श्वासही कोंडले घरामध्ये.

नाकेबंदी मुळे
सर्व सुनसान
मजुरांचा प्राण कंठी आला.

हवाई मार्गाने
सुरु आगमन
ते सर्व महान इंडीयन.

अवघा भारत
मृत्यूच्या छायेत
सुरक्षा घेऱ्यात सरकार.

श्रमिक-मजूर
विकासाचे चाक
त्यांची दमछाक संकटात.

जयांच्या हातांनी हा
देश उभा केला
तोच आज झाला निराधार.

टाळेबंदी मुळे
जगण्याचे वांधे
भविष्याचे सांधे निखळले.

घामातून ज्यांच्या
सौंदर्य फुलले
तेच कोमेजले फुलासम.

कोंडलेली वाफ
जैसी ये बाहेर

तैसे हे मजूर रस्त्यावर.

आई-बाबासह
पत्नीही सोबत
तीच्याही गर्भात नवांकुर.

चालताना तीचे
जड झाले पाय
रस्त्यातच गाय हंबरली.

✍ **मनोहर नाईक**

कारोनाचे वादळ

कोरोनाचे काटे आता, डंक झाले आहेत.
वेदनांचे विव्हळने, जीवन मागते आहे.

संवेदना साऱ्या, शुन्यावल्या आहेत.
अनेक घरातील दिवे आता, विझले आहेत.

वादळ कोरोनाचे वेडे-पिसे, होत आहे.
अद्भुत हा कोरोना माणसाला, ध्वस्त करत आहे.

मृत्यु अनेक झाले, पण अनोखेच ते आहेत.
दुःख डोळ्यातून येताना, लाल झरत आहे.

हरवले आकाश; झोपडीही, पायवाट तीही पुसट आहे.
चूल निवली, पाटावर रांधणारीच्या फक्त खुणाच आहेत.

वैफल्याचा तो दाह एकटा, अंग पोळतो आहे.
राखेत त्या, त्या-कोरोनाची नाडी शोधतो आहे.

त्या चोरटयाच्या भीतीने हृदयात, कंप; हादरे आहेत.
वाट रोकुनी उभा तो, जगाला वेठीस बांधतो आहेत.

कोण जाईल त्या चितेत, भविष्य कुणाचे चेतले आहे.
हतबलांचे उसासे थकुन आता केवळ, खेद मांडताहेत.

वाऱ्यापरी पायपीट अनवाणी, उन्ह कापते आहे.
अर्थाचा अनर्थ ना कळला कुणाला, अंदाजही हारले आहेत.

मांडलेले पसारे निर्वाणीचे, व्यर्थ कहाणी सांगताहेत.
कोंडलेले आजचे पक्षी, मोकळे कुरण मांगताहेत.

ध्यासाचे धन्वन्तरी; कोटी-कोटी जनांचा, सांभाळ करताहेत.
अन्तःप्रेरणेचा कस लावुनी ती, जीव संजीवनी आहे.

कोरोनाचे थकले वादळ, जगातून पसार होत आहे.
उदयास येतो सूर्य भर क्रांतीचा, पूर्वेस नवे पर्व आहे.

✍ **अनुराधा मजुमदार**

माझी प्रार्थना

सर्व प्रार्थना निरर्थक आहेत,
तरी मी जोडले हात
प्रार्थनेसाठी
माझी पार्थना
विश्वकल्याणासाठी
मला माहिती आहे
प्रार्थनेसाठी जोडलेल्या हातांपेक्षा
मदतीसाठी पुढे सरसावलेल्या हाताचे महत्व
तरी
माझी प्रार्थना
नाही कोणत्याही दगडाला
नाही ईश्वर, अल्ला, गॉडला
नाही त्याचा दूत, प्रेषित किंवा मुल्लाला
माझी प्रार्थना
विश्वव्यापी मानवाला
सार्वभौम, सर्वश्रेष्ठ व्हायच्या नादात
दिवसेंदिवस दगड होत चाललेल्या
त्यांच्यातील मानवतेला
तृष्णाग्निच्या वनव्यात होरपळणाऱ्या,
दुःख भाराने व्यथित झालेल्या
विश्वाच्या दुःख मुक्तिसाठी
माझी प्रार्थना
मानवतेसाठी... मानवाला
त्यांने जगवावी प्रज्ञा
वाढवावी करुणा
निर्मावी मैत्री
वाटावा आनंद म्हणून
माझी प्रार्थना मानवाला... मानवासाठी
अजूनही माझा
मानवतेवरिल अढळ विश्वास कायम आहे म्हणून...

✍ **विलास गजबे**

वाहाडला लॉकडाउन

घेन्न बापू आता,
बोम्बलतं काऊन।
दिवसेंदिवस आत्ता
वाहाडला लॉकडाउन।।

जगभर कोरोनानं
माजवला कहर।
सवधानी म्हणूनशान
झाले बंद गाव शहर।
उपचार झाला सुरू
जागोजागी रोगी शोधून।।१।।

बाबा दादा करून तुले
सारे सांगे मरू मरु।
घरीच थांबा म्हने
रस्त्याईवर नोका फिरु।।
सुधरले नाही
पोलिसायचे दंडे खाऊन।।२।।

खोकता शिंकता करा म्हणे
रूमालाचा वापर।
मास्क आनं रूमाल
बांधा तोंडावर।।
आयकलं नाही कोणाचं
नाही वारंवार घेतले हात धूवून।।३।।

सांगत होतो तुले
अंतर ठिवून वाग।
सामानसुमान घेताना
रांगेमंधी लाग।।
गर्दी करून बसला
लोकाई मंधी जाऊन।।४।।

डाकटर नर्स पोलिस
सफाई कामगार।
रातदिन सेवा करती
सोडून आपले घर।।
गरिबायच्या सेवेसाठी समदे येती धाऊन।।५।।

लाकडाऊन वाहाडला
आपल्या भल्यासाठी।
कोरोनामुक्त देश
हीच गोष्ट मोठी।।
प्रशासनाला साथ द्या
घरातच राहून।।६।।

काळजी घेवू स्वता:ची
घरात राहू सारे।
कुटुंबात तवा वाहती
आनंदाचे वारे।।
कोरोनाशी लढून जिंकू
सारे एक होऊन।।७।।

वाहाडला तं वाहाडू
देंन लॉकडाउन।
सरकारचे धोरणं
समद्यायले सांगू समजाऊन।।
समदे मिळून एकोप्यानं
लावू करोनाले पळवून।।८।।

✍ **प्रशांत जांभुळकर**

मोकळा श्वास

सर्व जगावर।
कोरोनाचे भय।
बाळगे संशय।
जो तो आता॥

मृत्यूचा हा दूत।
फैलवी आतंक।
सर्व अगतिक।
प्राणीजात॥

घरात आनंदी।
असे काही जण।
काहींचे सरण।
दृष्टीपुढे॥

हात धुवा स्वच्छ।
ठेवावे अंतर।
नाही गत्यंतर।
त्याच्याविना॥

महामारी आली।
आमच्या जीवनी।
कोणाची करणी।
भरे कोण?॥

थांबव कोरोना।
मृत्यूचा सोहळा।
श्वास रे मोकळा।
घेवू द्यावा॥

✍ **पवन कामडी 'प्रीत'**

युद्ध मानवाचे

नगरे जाहली विराण
रस्ते जाहले सुनसान
शहरेही गजबजलेली
होऊनी उरली स्मशान

खुशहाली काल होती
आज अनामिक भीती
दिवस उदासीन भासे
रात्र वैऱ्यापरी भयाण

मानवा गाफील ठेवूनि
अदृश्य कोरोना होऊनी
साधीला डाव नियतीने
माजविले मृत्यूचे थैमान

जग जवळी एवढे आले
वसुधैवकुटुंबकम भासले
परि अवचित या विपदेने
झाले आप्त परके समान

जो जिथेही होता गेला
तो तिथेच मग थांबला
रुतले रथचक्र जगाचे
अगतिक ज्ञान-विज्ञान

घोर हा लागला जीवांना
लहान वा थोर साऱ्यांना
सावरील कोण कुणाला
जो-तो सारेच येथे हैराण

आहे सुरू युद्ध मानवांचे
अविरत वैद्यकि सैनिकांचे
मात देऊनी शत्रूला नादान
ठरू आम्ही अंती बलवान

✍ **गणेश पांडे**

राहूनच गेलं

या कोरोनाने संपूर्ण जग
हैराण होऊन गेलं
मोठयांचे मोठेपण विसरून गेलं
जेव्हा घरात कुटुंब तयार झालं
मुलांशी खेळण्याची वेळ आली
तेव्हा लक्षात आलं
कुटुंबावर प्रेम करणं... राहूनच गेलं.

कोरोना तू आलास
लोकांचे जीव घ्यायला
पण, आम्ही घरात बसलो
तुझाच जीव घ्यायला
एक मात्र तू बरं केलंस
प्रदूषण एक ते कमी केलंस
तेव्हा त्या पाखरांच्याही लक्षात आलं
खरं जीवन जगणे तर... राहूनच गेलं.

कोरोना तू आलास
आणि आजी-आजोबांचं
नातं लक्षात आलं
तेव्हा कळलं
कल्पनेतल्या हिरोला महत्त्व देतांना
वास्तवातील हिरोला महत्त्व देणं... राहूनच गेलं.

कोरोना तू आलास
आणिक तुला हरवण्यासाठी अनेकांनी लाखो रुपये दिले
दिवस रात्र तुझ्या सोबत राहून
डॉक्टर, नर्सेस, पोलीस
ज्यांनी आमचे रक्षण केले
स्वतःचे प्राण पणाला लावले
तेव्हा लक्षात आलं
खऱ्या कलाकारांचे आभार मानणे तर... राहूनच गेलं.

✍ **प्राजक्ता दाणी**

कामगार बोलतोय

हरामखोरीचा कळस गाठल्यावर,
पैकेजचे गाजर मी घेणार नाही.
कामगार आहे अस्वस्थ मी,
बोलल्याशिवाय राहणार नाही.

विदेशातून श्रीमंतांना विमानाने आणता,
रूळाखाली आम्ही मरणार नाही.
रोग लागेल म्हणून नाक मुरडता,
दुटप्पीपणा आता जमणार नाही.

आम्हीच तुमच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे,
तुमचा हा भेदभाव चालणार नाही.
चालताना मेलेल मूल टाकून दिले आम्ही,
भविष्यात बदला घेतल्याशिवाय राहणार नाही.

एका-एका मताचे मैनेजमेंट करताना,
का मजुरांना घरी नेण्यासाठी जमणार नाही?
पुढे दारातही आले मतांची भीक मागायला तरी,
तुम्हाला जोड़े मारायला डरणार नाही

गरोदर बाई मुले, उन्हात चालताना,
तुम्हाला जराही कीव येणार नाही.
एसीत बसून फक्त बाता करणे सोपे आहे,
माणुसकीचे दर्शन रस्त्यावर घडणार नाही.

तिकिटाचे पैसे सुद्धा मजुरांना मागताना,
कफल्लक सरकार लाजणार नाही.
एक गोष्ट लक्षात कायमची असू द्यावी,
मजुरांचा कणा कधीच वाकणार नाही.

✍ **वेणूप्रशांत**

हद्दपार करू महामारी

जगात आली आहे
कोरोनाची महामारी
नका घाबरु-बावरू
अवघे नर-नारी

नाही लस ना औषध
भय दाटले अंतरी
जीवनात अवेळी
आली मरणाची स्वारी

चला नियम पाळूया
अंतरही राखुया
हात धुवा मास्क लावा
संदेश देऊ घरोघरी

शरीराने राहा दूर
मनाने जवळीक साधा
भुकेल्याना दोन घास
देऊ मायेने भाकरी

शतदा करते नमन
देवदूत ते कर्मचारी
लढले जे रात्रंदिन
प्राण घेऊन हातावरी

माणसातल्या देवाचे
पांग नाही फिटणार
शासनाचे नियम पाळून
करू हद्दपार महामारी

✍ **वर्षा गंगणे**

विस्तवाचे वास्तव

सारं काही पोटासाठी
कोसो दूर वणवण
झिजून गेल्या चपला तरी
पायांची होते घसरण

गाव दूरवर
तरीही चालत राहायचं
पोटात नाही दाणा
समूहाने जगत राहायचं

बांधली शिदोरी भाकरीची
बायको-पोरा संगे खायची
झोप आली तर झोपायचं
उद्याच्या सूर्यासाठी जगायचं

थकून गेला देह आता
गावाकरीता टेकीला माथा
मरण स्वस्त जाहले आता
रक्ताने लिहिली श्रमगाथा

✍ **विशाखा कांबळे**

सारं कसं शांत शांत

सारं कसं शांत शांत,
वाटतोय कुठला वेगळाच प्रांत.
रोजची गडबड, रोजची घाई,
दिसतच नाही कुठे काही.
काही असो पण छान वाटतंय,
स्वतःलाच भेटल्या सारखं भासतंय.
बंगला बांधून वर्षे लोटली,
राहण्याची हौस नव्हती फिटली.
आता मात्र राहता आलं,
पुन्हा नव्याने पहाता आलं.
तणाव घेऊन फिरत होतो,
हव्यासापोटी झुरत होतो.
स्वतःला दिला नाही वेळ,
म्हणूनच जमला नाही मेळ.
नाती गोती हरवून गेली,
रिक्त राहिली माझी झोळी.
मग अवतरला एक विषाणू,
जागृत करण्यासाठीच जणू.
त्याच्या पायी धाव थांबली,
आपुली आपणा ओळख झाली.
माणुसकीला आली जाग,
असे फेडावे त्याचे पांग?
जरी विषाणू असला तरी,
त्याने शिकवण दिली खरी.
गती म्हणजे नसते प्रगती,
जिथे अति तिथे माती.

✍ **जयश्री जोशी**

वेड्या माणसा

वेड्या माणसा, वेड्या माणसा,
धाव धाव धावशील किती?
घाई, गडबड करशील किती?
निरर्थक घामात तू नाहशील किती?
क्षणभर तर थांब आपल्या श्वासासाठी
थंड जलाच्या घोटासाठी.
आहे तरी का फुरसत कोणासाठी,
घरात विसावा, हिरवा निसर्ग दिसावा,
थोड्या तरी संवादासाठी||१||

वेड्या माणसा, वेड्या माणसा,
धाव धाव धावशील किती?
रंगाचे आज बेरंग झाले जीवना
देऊळ स्वप्नाचे भंग झाले,
हतबल झाल्या साऱ्या कामना.
रस्ते ही आज निःशब्द, निःसंग आहे,
वैऱ्यापरी आज आधार स्तंभ झाले||२||

वेड्या माणसा, वेड्या माणसा,
धाव धाव धावशील किती?
होतात अजूनही भास सुखाचे मनाला,
जीवनाचे आज पुरते व्यंग झाले,
कल्लोळ या मनी भावनाचा,
सर्व काही आभासी झाले.
उजाड हे मन बधिर स्तब्ध अंतरंग झाले||३||

✍ **निर्मिती देवलसी**

लेक म्हणाली

लेक म्हणाली,
पप्पां टेक युवर इडीयंन पिज्जा ?

मी फक्त बघीतलं तिच्या कडे...

लेक हसली गालात, अन् पुढ्यात ठेवली तिन भाकर.
सौ नी भाजली होती तव्यावर छान!
कधीतरी मनकप्यात साठला असलेला तिचा तो गंध
एकदम मणात भरला अन् मी तुटून पडलो तिच्यावर.

लाकडाऊन च्या ह्या वेळी, घरात सुरक्षित असलेल्या काळी.

आठवल बालपण
आईनी कोर-कोर वाढलेली भाकर
कसलातरी रस्सा, चटणीचं पेडं.

मी हात झटकायचो नेहमी हे सारं पाहुन
तिच्या डोळ्याच्या कडा पाणावायच्या
पण, मला नाहीच दिसल्या कधी
मग दुसरं काहीतरी चिमूटभर ठेवायची ताटात
म्हणायची 'बाळ' आणि मी मुकाट्याने संपवायचो
देवाचा आजचा प्रसाद म्हणून.
वाढलेल्या भाकरीसोबत मिटक्या मारत
लहान भाऊ, बहीण, वडीलही असायचे पगंतीला
कधी आजी-आजोबा,काका-आत्या ही
अन्न हे पुर्ण ब्रम्ह, लोकजीवनाची शिकवण ग्रहण करत.
साऱ्यांची ताटं सफाचट असत
शितं न शित ताटातून पोटात गेलेलं.

✍ **शरद शहारे**

इतिश्री कोरोनाची

कोरोनाने दिलाय या जगाला अर्धविराम,
अविरत धावणाऱ्या जीवांना मिळाला थोडा आराम.

आनंदाची बाब असूनही यामागे दुःख मोठं लपलय,
मृत्यूचे भय आणि सावट दुनियेत सर्वत्र पसरलंय.

प्रत्येक मनुष्यप्राणी जो द्रव्य संचयनात होता मग्न,
स्वतः च्या प्राणापुढे आता सगळेच ठरले नगण्य.

या परिस्थितीमुळे उद्भवलाय सगळीकडे हाहा:कार,
उडालीय लोकांची त्रेधा-तिरपीट आणि धावपळ अपार.

सरकारला आहे आपल्या नागरिकांची चिंता,
त्यासाठीच राबवताहेत काही महत्त्वपूर्ण मोहिमा.

सगळ्यांनी घ्यावा या आपातकालीन योजनेचा लाभ,
आणि करावा कोरोना नावाच्या दैत्याचा समूळ विनाश.

घेऊ काळजी एकमेकांची , कुटुंबाची तशीच समाजाची,
शिताफीने करू सामना कोरोना सारख्या यमराजाशी.

पर्यावरणाचे करू संरक्षण , घेऊ काळजी भूमातेची,
अश्या प्रकारे करता येईल इतिश्री कोरोना विषाणूची.

✍प्रतिभा बिलगी 'प्रिती'

कोरोना काळातील संवेदना

कोरोना काळात अचानक जादू झाली,
भारतीयांची संवेदना म्हणे जागी झाली.
लॉकडाऊन काळात व्यापार बंद झाले,
श्रमिक, मजूर सारे क्षणात रिकामे झाले.

वितभर पोटासाठी जन्मगाव लाथाडले,
जगबंद झाल्यावर तेच पुन्हा आठवले.
बस, रेल्वे प्रवास सारे जरी बंद झाले,
तरी श्रमिकांचे तांडे गावाकडे निघाले.

भुकेल्या जीवांसाठी कुणी अन्नदान केले,
कुठे फाटक्या आभाळाला ठिगळ लावले.
जात, धर्म, लिंग, पंथ सारेच गौण झाले,
माणूसकीचे दर्शन असे अनुभवास आले.

काही ठिकाणी मात्र माणूसकी हरवलेली,
कोरोनाच्या भितीने नाती-गोती विसरलेली.
आधुनिकतेने स्वदेहालाच असे महत्त्व दिले,
इतरांना कोरोना पसरवणारे शरीर समजू लागले.

आत्म आणि आत्म्याला उरला नाही अर्थ,
दिसू लागला जगण्याचा मोह आणि स्वार्थ.
नश्वर, अशाश्वत देहाचे महत्त्व इथे वाढले,
जगण्यासाठी इतरांशी अमानुष वागू लागले.

भिती आणि सतर्कता यातले अंतर जाणू
मनातील संवेदना आपण आता जीवंत ठेऊ
सोशल डिस्टंसिंग पाळत सावधगिरी बाळगू
इमोशनल क्लोजनेस मात्र सजगतेने जागवू

एक दिवस कोरोना नक्की पळून जाणार
भारतीय संस्कृती तेव्हा वाहवा मिळवणार
मानवता अन् विश्वाला जगण्यायोग्य बनवू
हातात हात घेऊन गीत विजयाचे गाऊ

✍ **शिल्पा ढोमणे**

कोरोनाचं महाभारत

फिरली मानवी मती झाला बुद्धीचा अहंकार,
विकासाच्या नावे केला निसर्गाशी दुराचार.

अनिर्बंध ओरबाडूनही मानव झाला कृतघ्न,
भावी पिढ्यांच्या भविष्यात पेरले अनेक विघ्न.

सर्व शक्तीमान विधात्याने ठानलं पक्क मनीं
हरवूनिया मानवी गर्व करून जीवित हानी.

मानवी दंभ ठेचण्याची आली निसर्गाला लहर,
फिरवून कांडी जादूची केला कोरोनारुपी कहर.

उडाली जगी खळबळ माजला हाहा:कार,
मिसळला मातीत सारा मानवी दांभिक अहंकार.

चित्र क्षणात पालटले गृहपिंजरी झाला मानव बंदिस्त,
घेतला निसर्गाने श्वास मोकळा पशुपक्षी विहरती भयमुक्त.

जाणिवेने भीषण वास्तवाच्या मानव पुरता हबकला,
संपली रोजची महामारी व्यवहार जगाचा थबकला.

नरनारी, राजारंक, सानथोर नाही केला मतभेद,
जखडून विळख्यात देशांना दिला वृथा कल्पनांना भेद.

गरीब ,मजूर, कामगारांनी सोसली टोकाची उपासमारी,
केली मैलोनमेल पायपीट टाळण्या लागट ही महामारी.

किंचित हबकलेला माणूस मृत्यूभयाने नाही डगमगला,
अल्पावधीत सावरून पुन्हा लढण्या पुढे सरसावला.

जातील दिस हे होईल पुर्ववत सारे आशावादी राहू या,
जाणून जीवनाची क्षणभंगुरता धडा यातून शिकुया.

✍ **वर्षा किडे 'कुलकर्णी'**

सुसंवाद

कुठून आणि कसा कोरोना
नशिबात आला,
सुरळीत चाललेला दिनक्रम
पार कोलमडून गेला.

जीवनावश्यक गरजा सोडून
सर्व झाले बंद,
पुरवायचे का रे आम्ही
घरातच आमचे छंद.

सैनिक, पोलीस, डॉक्टर, नर्स
सर्वच लागले कामाला,
कुठून आणि कसा आला
सूड उगवायला.

तुझ्या जाण्यासाठी वाजवली
सर्वांनीच घरोघरी टाळी,
तरीही घरी बसण्याची
आणली आमच्यावर पाळी.

एक दिवसाचा कर्फ्युसुद्धा
सुरळीत पार पडला,
शंख, घंटानाद कसा तो
गगनाला भिडला.

अजूनही जाण्याचे लक्षण
आम्हा तुझे दिसेना,
सांगते तुला घरातच मन
आमचे स्वस्थ काही बसेना.

सोन्यासारखी शाळा आमुची
तुझ्यामुळे बंद झाली,
माझ्या चिमुरड्यांची आठवण
मला खूप-खूप आली.

विनविते कोरोना मनापासून
हात जोडूनिया तुला,
आता तरी तुझ्या विळख्यातून
मुक्त कर आम्हाला.

आला तसा निघून जा
नको अंत आमुचा पाहू,
पहिल्यासारखेच आम्ही सारे
सुखासमाधानाने राहू.

✍ **मंजुश्री वाळुंज**

संवेदना

पर्यावरण साद देई मानवा पंचमहाभूतातून अविरत,
जंतू आला तो कुठून अन् शांत रे आसमंत.

आपलेच आपण सावरतो बघता-बघता हा निसर्ग,
नवनवीन क्लुप्ती शोधीतो अन थांबवतो तो विसर्ग.

काय घेतले नी दिले या आकस्मिक आपत्तीने,
विचारिस का मना, हृदयातून कधी शांत चित्ताने?

संधी दिली त्या परमात्म्याने स्वतःमधे डोकावताना,
किती साधली ही संधी जीवन सुखकर करावया?

कर सदुपयोग वेळेचा मानवा, आहे तो मुबलक सर्वकाळ,
प्राथमिकता बदल तू फ़क्त बघ महिमा दाखवेल काळ.

हाती वेळच नाही माझ्या सबब देऊ नको रे उगा,
प्राधान्य महत्त्व यांची सांगड हळूच देईल तुला दगा.

केलीस का रे मानवा या काळात शरीराची मशागत,
की आजचा बेत ढकलून उद्यावर केलीस स्वतःची फसगत?

चिंतन आणि मनन करी सैरभैर मन शांत नि प्रसन्न,
अवगत असूनही याची महती केलास काही प्रयत्न.

कळणारही नाही तुला झाले अवचित असे कसे?
वेळ जाईल निसटून अलगद पुन्हा ना हाती तुझ्या असे!

जागा हो रे मानवा, जाणीव दे अंतरीच्या मना,
बदलून टाक आमूलाग्र स्वतःला हीच कोरोना काळातील संवेदना.

✍ **प्रदीप फणसे**

हे देशा

हे देशा,
तुझ्या अंगा-खांद्यावर खेळणारी तुझी लेकरे
आज बंदिस्त झाली
हसणे खिदळणे सारे विसरून
तुझ्या लेकरांनी स्वतःला चार भिंतीत
कैद करून घेतले.

हे देशा,
तेव्हा तू मोकळा श्वास घेतलास.
हवा स्वच्छ, मोकळी
पण श्वास घ्यायला बाहेर माणसं नाहीत.
चौपदरीकरण झालेले रस्ते वाट पाहतात पण
रस्त्याला पाय लागत नाही.
निर्मळ झाले नदी, नाले, सरोवर
अजूनही पाण्याला हात लावायला कुणीच तयार नाही.

हे देशा,
तुझी काही लेकरे
हातात शस्त्र घेऊन,
तुझ्याच लेकरांना सांभाळतात
तुझा जीव गुदमरतो, रडतो
पण वेळीच वर्तमानाचे गांभीर्य
समजले असते
तर तुझी लेकरे आज
भूक, घर, कुटुंब आणि गाव,
यांच्याविना तडपून गेली नसती.

हे देशा,
तुझ्या लेकराविना तुला
शोभा नाही.
तुझ्याकडे सर्व असूनही
आज तू एकाकी पडलास.
मी हे सारं पाहतोय
आकाशातून तुला नाही
कारे दिसत...!

✍ **अश्विन खांडेकर**

बाकी हयात आहे

सुनसान शहर सारे, जो-तो घरात आहे.
शांती अबोध, नीरव, दाही दिशात आहे.

व्यापार ठप्प आणिक बाजार बंद झाले,
महसूलही बुडाला साऱ्यास ज्ञात आहे.

हे युद्ध चालले अन् गनिमास शोधतो मी.
तो दिसत यार नाही, दडला कशात आहे.

सारेच कारखाने बघ बंद आज पडले,
हातास काम कोठे उरले अशात आहे.

शेतात पीक माझ्या आले तसे जळाले,
मग राहिला न आता पैसा घरात आहे.

जो रोज राबतो अन् भरतोय पोट येथे,
त्याच्या घरात आटा कोठे डब्यात आहे.

खुप शोधले तरीही ज्याचा इलाज नाही.
तो रोग माणसाला झाला जगात आहे.

देहास लांब सारे आपापसात ठेवा,
संसर्ग मौत आणिक अंतर हयात आहे.

कोंडून घ्या जरासे आता घरात सारे,
तो माजलाय कोविड येथे जनात आहे.

शेरात खास येथे, सांगेल हे 'अनिल' की,
संपेल काळ हा ही, बाकी हयात आहे.

✍ **अनिल पाटील**

अतुल्य भारत

शोधू नका कुठे
शेतात आहे मी|
पोटात घेऊनी क्षुधा
भुक तुमची भागविण्या मी||

शोधू नका कुठे
सीमेवरी दक्ष मी|
सुरक्षेसाठी तुमच्या
तेल डोळ्यात घालूनी मी||

शोधू नका कुठे
ऊभा रस्त्यावरी मी|
बिनकामी फिरणाऱ्यांना
घालीन दंडूका मी||

शोधू नका कुठे
आरोग्यधामी आहे मी|
निरामय जीवनासाठी
दिनरात राबतो मी||

शोधू नका कुठे
गांव-शाळेत आहे मी|
उजेड पेरण्यासाठी
ज्ञानपणत्या लावितो मी||

शोधू नका कुठे
प्रातःकाळी रस्त्यावरी मी|
गलिच्छेतेला नसावा थारा
हाती खराटा घेऊनी मी||

शोधू नका कुठे
हुकूमाबरे हजर मी|
किरकोळ असेना ना काही
मजूर म्हणूनी सज्ज मी||

शोधू नका कुठे
बाहेर पडूनी कुणाला|
उगा का वाढविता चिंता
लावूनी प्राण पणाला||

शासन, प्रशासनाच्या
मदतीचे हात होऊ|
फिरण्याची हौस सोडा
घरी स्वस्थ, सुरक्षित राहू||

✍ **प्रदिप सोमकुंवर**

जिंदगी

दहा बाय दहाच्या खोलीत कैद झाली जिंदगी,
सुख-दुःखाच्या आड आता येऊ लागल्या भिंती.

हसणं, खेळणं, बागडणं सारच कसं कैद झालं,
मनालाही आता सारखं बंदिस्त वाटू लागलं.

दूर पर्यंत माणसांचा कुठे उरला नाही मागमूस,
रस्ते ,गल्ली सारच झालं कसं सामसूम.

माणस, जनावरं सारीच कशी केविलवाणी झाली,
जिंदगीशी सारे चार हात करू लागली.

मोबाईलच्या की-पॅडवर बोट तरातरा धावू लागली,
हसण्या-बोलण्यावर मात्र मर्यादा येऊ लागली.

फेसबुक, व्हाट्सएप , इंस्टा, सारच कसं बिझी झालं,
सोशल मीडियामुळे एकमेकांस भेटणं इझी झालं.

मुव्ही आणि टीव्ही मुळे मन रमू लागलं,
रामायण, महाभारतामुळे वातावरण धार्मिक होऊ लागलं.

वेबसिरीजच्या विश्वात मनाची गुंतागुंत झाली,
दहा बाय दहाच्या खोलीत मात्र जिंदगी कैद झाली.

✍ **अर्पित कापसे**

कसं सांगू

गगनचुंबी पुतळे बांधायला
खोऱ्यान पैसा आहे,
सामान्याच्या इलाजाला मात्र गंगाजळ आटलेला आहे
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

बाजाराविना शेतमाल सारा
जागीच सडत आहे,
मद्य विक्रीचा तोडगा मात्र सर्वांनाच पटलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

परदेशी अडकलेल्या अमीराला,
जहाजांची कुमक आहे.
स्थलांतरित मजुरांचा रस्ता मात्र पायीच कटलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

राजकारणाच्या मैदानात,
आरोपांचाच वर्षाव आहे.
चिमुकल्यांचा पाय मात्र रक्ताने माखलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

चाकरमान्यांना कसे,
पगारांचे बळ आहे.
हातावरच्या पोटात मात्र कावळा रुसलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

कर्ज-बुडवे, भामटे कसे,
महालात मुक्कामी आहे.
कष्टकऱ्याचा संसार मात्र रस्त्यात थाटलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

अरे माणसा येरे भानावर,
अजूनही वेळ आहे.
उगाच नको तक्रार निसर्गाचा तोल सुटलेला आहे.
कसं सांगू, माझा देश विविधतेने नटलेला आहे.

✍ **विलास डोईफोडे**

तू रक्षणकर्ता

आता तरी राया, थांबव हे सगळं,
तुझ्याही राऊळला, लागतील आज टाळं.

मायलेकरांच्या मनात वाहे कोरोनाचे भय,
गावागावातुनी सगळ्या फक्त लॉकडाऊन विषय.

शहरात माणसाच्या आज आहे स्मशान शांतता,
न राहिला दिसण्याजोगा प्रदूषनाचा भस्मासुर आता.

खेचूनी पदर वसुंधरेचा माणसाने स्वार्थ हा रोविला,
पेरूनी विष प्लास्टिकचे त्याने प्राणवायू जाळीला.

विध्वंस केला धरणीचा रक्तपात तरुचा,
भोगतो शाप आता डोंगराच्या वणव्याचा.

होता घुसमट नद्यांची पाझरही आटला,
मनुष्याच्या पेल्यात त्यांनी विषाणू सोडीला.

प्राणवायूसाठी देवा झटतोय हा माणूस,
गळ्याभोवती त्याच्या, लागलाय कोरोनाचा फास.

नाही करणार कधी पुन्हा धरणीवर आघात,
घेऊनी शपथ रक्षणाची करू नवी सुरुवात.

झाली चूक लेकरांची सांभाळून घे आता,
करुनि घात कोरोनाचा होच तू रक्षणकर्ता.

✍मंगेश दौडकर

चंचल मन

मन माझे धावते सैरावैरा
संचारबंदीत त्याला आवरून ठेवलंय जरा
ऐकना जरा माझिया मना
बाहेर दबा धरून बसलाय कोरोना

बस जरावेळ स्वस्थ गुपचूप
संचारबंदीनंतर धावायचे आहे खूप
समजाविले खूप मनाला
लाग आता तरी भजनाला

म्हणतील कोणी तर म्हणू दे
करून-करून भागले देवपूजेला लागले
मग मनाला काय वाटले
मन तीर्थ यात्रेला निघाले

पालथी घातली देवळे सारी
एकाही देवळात देव नाही
उमगले मनाला एकाच क्षणात
अवतरले बहुदा कुणाच्यातरी रुपात

कुणी अवतरले डॉक्टरच्या रुपात
कुणी सेविका, कुणी पोलिसांच्या रुपात
श्रीकृष्ण याने केले कालिया मर्दन
आता हे करतील कोरोना मर्दन

आता तरी घ्या समजून
देव असतो आपल्या अंतरी
नसे राऊळी वा नसे मंदिरी
हृया सर्वांमध्येच भेटेल हरी

✍ **उषा ठाकरे**

ठेव थोडं त्यांच्यासाठी

लॉकडाऊन होण्यासाठी
माझ्याकडे घर आहे
दोन्ही वेळा भागवायला
अन्नही पोटभर आहे

मनोरंजन खूप आहे
टीव्ही आणि इंटरनेट
हवं ते मिळतंय सारं
एक फोन करता थेट

दिवसभर व्हॉटसएप चालू
भ्रमणध्वनी हाताशी
कपाटात पुस्तकाच्या
रचून ठेवलेल्या राशी

खूप जरी नसले तरी
पैसे आहेत खात्यामध्ये
गळ्यात गळा नसला तरी
ओल आहे नात्यामध्ये

वीज आहे, पाणी आहे
तसं काहीच कमी नाही
उगीच कशाला कन्हायचं
कारण काढत काहीबाही

कित्येक जण असे आहेत
ज्यांच्याकडे नाही सारं
कसं असतील जगत ते
अभावाचे झेलत वार

त्यांच्याकडे नाही बरं का
वरीलपैकी एकही गोष्ट
शारीरिक अन मानसिक
नशिबामध्ये केवळ कष्ट

तुलनेमध्ये त्यांच्या आपण
सुखी आहोत कितीतरी
देवाजीची आपल्यावरती
कृपा आहे हीच खरी

कृतज्ञ मी देवा तुझा
जे दिलय त्याच्यासाठी
ज्यांच्याकडे काहीच नाही
ठेव थोडं त्यांच्यासाठी

✍ **दीपक उपाध्ये**

मुक्ती देशील का?

थरथरतेची चोच, नयनी आभाळाचे बिंब.
उतरते डोळ्यात निळाई, नभसम ती ही अथांग.
किलबिल मधुर लाघवी, ती लोभस आहे वाणी.
की आक्रंदुन तो गाई, वाऱ्यावर कैद कहानी.
पंखास हौस गगनाची, इथे मुक्ती हवी जिवाला.
पिंजऱ्याच्या नसते हाती, सोडवणे इथे कुणाला.
कांचपेटीमधला मासा अश्रू पेटीत मिसळतो.
भेदरलेल्या नजरेने मग काचेला स्पर्शित बसतो.
पारदर्शी पेटीमधले सीमित विश्व, आयुष्य.
तडफ़डतो मासा तरीही विश्रब्धच दिसते दृश्य.
ना झरा, ना सरितेला व नभ अन धरतीला
स्वातंत्र्याच्या अर्थ उगमतो फ़क्त बंदिशाळेला.
जग खिडकीतून पाहताना, ती दार बंद करताना.
काहीश्याच दिवसांमध्ये पाहिले तुला रडताना.
जगणे स्वातंत्र्य मागत असते आता तरी कळले का रे?
कैदेतिल मुक्या जिवांना तू मुक्ती देशील ना रे?

✍ **किमया तेंडूलकर**

कोरोना जागृति अभंग

चीनी उपजला| विषाणु कोरोना|
केली सारी दैना| जगामाजी ||१||

नाही अपवाद| भारत भू त्याला|
कहरची केला| महामारी ||२||

संचारबंदीचे| पाळावे नियम|
ठेवूनि संयम| मनावरी ||३||

जपावे आरोग्य| कास स्वच्छतेची|
सकस अन्नाची| सदोदित ||४||

बाहेर पडता| बांधी नाक-मुख|
रोगाणुरोधक| अनिवार्य ||५||

भान वास्तवाचे| घातक प्रचार|
अफवा प्रसार| टाळूनिया ||६||

सहाय्य करोनि| दीनदुबळ्यांना|
शमवी वेदना| व्यथितांची ||७||

अहोरात्र खडे| कर्तव्या तत्पर|
पोलिस, डॉक्टर| वंदनीय ||८||

रण अस्तित्वाचे| लढू प्राणपणे|
सवे सोबतीने| सकलांसी ||९||

सरतील दिस| टळेल संकट|
होई नायनाट| पूर्णपणे ||१०||

✍ **सुचिता कराळे**

कसा येऊ रे...

खांद्यावर आहे बाळा
सुरक्षेची जबाबदारी,
तुला भेटावया आता
कसा येऊ मी रे घरी||

एकुलता एक माझा
घरी येण्यास मी भीतो,
आहे कर्तव्याची जाण
गल्ली-गल्लीत रे जातो||

मानवाच्या जीवासाठी
रोज रुग्णांना शोधतो,
देशाचा सुरक्षेसाठी
पोरा काळजी करतो||

आली कशी महामारी
आम्ही लढन्यास सज्ज,
पार पाडू कर्तव्याला
वाचवू देश अन् राज्य||

बघून ही महामारी
अश्रु श्मशान ढाळतो,
विषाणुच्या भितीपायी
घरी येण्यास टाळतो||

सांगणे येवढेच घे
स्वतः काळजी जणांची,
लढा देऊ एकतेने
करू अंत्येष्ठि कोरोनाची||

✍ **बाबाराव निमजे**

कधी वाटलं होतं का?

कधी वाटलं होतं का?
असेही दिवस येतील?
माणसं एकमेकांना भेटायला तरसतील.
कधी वाटलं होतं का?
माणसांच्या गर्दीतून
माणूसच गायब होईल?
सगळं ऐश्वर्य असूनही माणूस एकटा होईल?

कधी वाटलं होतं का असं होईल?
एकेकाळी गर्दीने बहरलेले रस्ते,
असे अचानक सामसूम होतील?
हॉटेल मधून येणारे सुवास,
हसणारे, खिदळणारे आवाज
लुप्त होतील?

कधी वाटलं होतं का असंही होईल?
सोसायट्यांमधून एकमेकांशी
टाळ्या देत मारलेले संवाद,
नाहीसे होतील?
लोक एकमेकांना लांबूनच
राम-राम ठोकून निघून जातील.

कधी वाटलं होतं का?
अंगणात खेळणारी मुलं,
हसणारी, बागडणारी मुलं,
आपापल्या घरात बंदिस्त होतील ?

कधी वाटलं होतं का?
भले विज्ञान तंत्रज्ञान,
आज कितीही पुढे गेलं,
चंद्रावर जरी जाऊन पोचलं,
तरी एवढ्या शूद्र विषाणु पुढे, निसर्गापुढे,
माणूस एक दिवस असा
नतमस्तक होईल?
कधी वाटलं होतं का?

✍ **अनिका उपाध्ये**

सांग तयांना कसे मी विसरू?

पाहता ते करुण दृश्य,
मन भरून आले आज.
भेगाळल्या त्या पाऊलांना,
जखमांचा रे होता साज.

कुठून आले कुठे चालले,
कुणास काही नच कळेना.
पाऊल चाले पुढे-पुढे रे,
उसंत जराशी नच मिळेना.

दाटून आले हृदय माझे,
दिला जरासा मीच ठाव.
जाणून घेई डबडबलेल्या,
डोळ्यांमधला मीच भाव.

भरल्या डोळी भरविला मी,
आपूलकिचा घास तयांना.
कधी गाठावे घर आपुले,
होता लागला ध्यास तयांना.

जाता-जाता वळून पाहे,
डोळ्यांतुनि गळती अश्रू.
संवेदना हया जाग्या झाल्या,
सांग तयांना कसे मी विसरू?

✍ **लीलाधर दवंडे**

पावलं

दवाखान्यात भरती झाली परवा पावलं चार,
एक पावलाची जोडी मऊसूत, दूसरी राठ फार.

मऊ पावलं विमानातून अलगत जमिनीवर आली,
राठ पावलं खदखदत्या खाणींच्या कोळश्यात न्हाली.

मऊ पावलांनी स्पर्शली होती इटलीच्या बीचवर माती,
राठ पावलांना अन्न, वस्त्र, निवाऱ्याची भ्रांत होती.

मऊ पावलं धोका कळता घरून करती कामे,
राठ पावालांची पाकीट, कपाट चोरकप्पेही रिकामे.

मऊ पावलं संचारबंदी एन्जॉय करायला शिकली,
राठ पावलांनी पोटासाठी शेत, घर विकली.

मऊ पावलांनी आजमावले रोज नवीन कलागुण,
राठ पावलं गावी पोहचली रस्त्यात भीक मागून.

मऊ पावलांना नाही वाटला संचारबंदीचा जाच,
पोटऱ्यावर लाठीमाराची वेदना कळे राठ पावलांनाच.

मऊ पावलांना घरी बसनं बोअरिंग थोड वाटलं,
राठ पावलांच्या धर्माचं, धरतीच राजकारण पटलं.

मऊ पावलं अंग तपताच मोठ्या काळजीत पडली,
मऊ पावलांची चाकरीच राठ पावलांना नडली.

मऊ पावलांच मोठ्या रुग्नालयात दाखल व्हायच ठरलं,
राठ पावलां साठी मात्र शासकीय रुग्णालयच उरलं.

मऊ पावलांनाही कोरोनाने सरकारी रुग्णालयात नेलं,
राठ पावलं सभोवताली बघता अवसान त्याच गेलं.

मृत्यूच्या दाढेत पावलांची नरमाई बघतं कोण?
मऊ असो व राठ असो, डॉक्टर साठी पावलं दोन.

प्रयत्नांची शर्थ करून कोरोना केला बरा,
मऊ पावलं, राठ पावलं निघाली आपल्या घरा.

राठ पावलांनी वस्तीकडे वळताना निरोपाचा नमस्कार केला,
मऊ पावलांनी जादाचा एक मास्क राठ पावलांना दिला.

✍ **श्रुति भामरे**

जगणे नटून गेले

वळणावरचे वळून पहाणे तरुण करुन गेले,
लोकडाऊनच्या काळातले दुखणे सरून गेले.

पदराचा काठ नि जुळता गजऱ्याचा थाट,
बंद मधले गजऱ्याचे दरवळणे जपुन गेले.

कधी न घडला असा रोमांचित प्रसंग,
'त्या' क्षणातले बहकणे ठसून गेले.

गल्ली-गल्ली हल्ली मन माझे पाखरू.
इश्काच्या पंखाचे फडफडणे तडफडून गेले.

कोण ती अनोळखी येता-जाता नजरेत भरे,
सुनसान राज्यातले जगणे नटून गेले.

✍ **उल्हास डांगोरे**

जिथं-तिथं, जिथं-तिथं... धसलाय कोरोना

बाहेर सोबती
धाडस करून गेला
उगाच आपलं
ढुंगन सुजवुन आला
लाजेपायी बिचारा
दुःख आपले सांगेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

दुर दूरचे डोंगर
स्पष्ट दिसू लागले
जवळ जवळची माणसे मात्र
नजरेआड झाले
ऑफीस, शाळा सगळ बंद
बाहेर कुणी दिसेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

नमाज, आरत्या
सगळे स्तब्ध झाले
माणसं तर माणसं
देवही बंद झाले
दुपारीच झोपलो
रात्री झोपच येईना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

मायदेशी निघाल्यांचे
फाटलेत तळवे
त्यावरही राजनीति
हे पांढरपेशी भडवे
तरी या खादाडयांच
पोट काही भरेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

चिमुकलीचे पाय कसे
रेंगळताय बघा
पप्पा मात्र काय करणार

त्याचा हातात नाही जागा
हा तर फोटोत व्यस्त
मोबाइल हातचा सुटेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

परवा अन्न घेऊन
काही देवमाणस आली होती
आमची सारी वस्ती
खुप गरीब झाली होती
सेल्फी, व्हीडीयो काढण्याचा
आवेग काही आवरेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

कोरोन्याच्या लढयासाठी
खरे देव निघाले
पाठीवर दगड घेऊन
बहुतांशी परत आले
कसे हे पागल लोकं
आता काही समजेना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

ज्यांच्यावर जिम्मेदारी
ते करतात आपसात टीका
पूरे झाले आता
काढा कोरोनवार टिका
बेशरम झाल्या वेदना
मंद पडल्या संवेदना
जिथं-तिथं, जिथं-तिथं
धसलाय कोरोना

✍ **राजकुमार कुंभारे**

आले कसे विषारी

.
आले कसे विषारी देशात आज वारे
जगण्यावरी असे का हे लागले पहारे.

सारेच श्रेय घेतो माणूस जीवनाचे
निसर्ग श्रेष्ठ आहे अंतिम सत्य सारे.

तो रावणाप्रमाणे मगरुर होत आहे
त्याचेच काळ त्याला देतोच हे इशारे.

नाहिच श्वास तुझा नाहीच श्वास माझा
तो वाजवीत आहे खोटेच हे नगारे.

आयुष्य एक यात्रा सत्कर्म आठवांची
माणुसकिच तुझी गाईल गीत सारे.

घेतोस झेप सारी तू रोज आसमंती
कैदेत मात्र नाही हे आसमंत तारे.

करतो प्रयोग आम्ही माणूस मारण्याचे
निसर्ग आणतो या जगण्यावरी शहारे.

✍ **विष्णू सोळंके**

कोरोना काळातील संवेदना

रण-रण उन्हात,
जीवाची काहिली होत असताना,
उपाशीपोटी अमर्याद अंतर
चालत राहणारे मजूर,
भर उन्हाळ्यात पी.पी.ई. किट मधे बंधिस्त होउन
कित्येक तास तहान-भूक, उत्सर्जन, उकाडा, संसर्गाची भीती
सगळ बाजूला टाकून
सेवा करणारे आरोग्यसेवक,
आजोळी सुटीला जाऊन अडकून पडलेली,
आईबाबाकडे परत जाण्यासाठी
आसुसलेली लहान मुले,
नौकऱ्या गेमावलेले कोट्यावधी लोक,
व्यवसाय ठप्प झालेले कोट्यावधी लोक,
कोरोनाला बळी पडलेले लोक,
त्याच्या अंत्य संस्कराला इच्छा असुनही
न जाऊ शकलेले लोक,
कोरोना पिडीत रुग्ण,
लोकांना वाळीत टाकलेले कोरोनाग्रस्त कुटुंबीय,
परदेशात अडकून पडलेले लोक,
पर राज्यातून आपल्या राज्यात परतलेली
पण विलगीकरनात राहिलेली माणसे,
धोका असुनही कर्तव्य बजवाणारे डॉक्टर,
वैद्यकिय कर्मचारी, परिचारिका, सफाई दूत,
आपल्याच लोकांना
कोरोनाच्या भीतीने टाळणारे लोक,
मंदीत गेलेली अर्थव्यवस्था,
कधी नव्हे ते थांबलेली मोठी शहरे,
हातावर पोट असणारे लोक,
जीवनावश्यक वस्तूचे भाव,
आपल्या उत्पादानाच्या जाहिरातीत
सौंदर्य घटक बाजूला काढून
सुरक्षितता घटक आणणारे साबण उद्योग,
वारंवार अंघोळ करणारे मंत्रचळ ग्रस्त लोक,
रद्द झालेले कार्यक्रम, सभा, संमेलने
बंद पडलेले कारखाने,
बंद पडलेल्या टी. व्ही. मलिका,
थांबलेली वाहतूक, दळणवळण,
थांबलेला आंतरराष्ट्रीय व्यापार,

जागतिक राजकारण,
सत्ता स्पर्धेची आस,
ओस पडलेल्या शाळा
पुढे ढकलेलेल्या परीक्षा,
कित्येकाच्या आशा, आकांशा, स्वप्ने,
सुरळीत चाललं असताना
अचानक ठप्प पडलेलं जग,
या सगळ्यातून केवळ आणि केवळ
आपलं अस्तित्व दाखवत राहतो,
एवढासा, न दिसणारा विषाणू,
कोरोना!
मग का आणि कसला,
माज बाळगावा मानवाने?

✍ **हर्षदा सुंठणकर**

अजूनही मानवता शिल्लक आहे

वेदनेच्या वादळात हल्ली,
वाहत आहे माझं गांव.
जिकडे नजर पोहचते तिकडे,
दारिद्र्यच दारिद्र्य दिसते,
काळजावर तेव्हा माझ्या,
वर्मी बसतोय दु:खाचा घाव.
आश्रय तरी मिळेल का हो,
या आशेवरच्या गोरगरिबांना.
की लुप्त झाली माणुसकी
घाबरून चार दिवसाच्या संकटांना.
कोरोनाने शिकविले अनुभवाचे धडे,
आपलेच आपले राहिले नाहीत,
उरलेत ते दगडाच्या काळजाचे खळे.
उघड्या पायांनी त्यांनी,
किती करावी पायपिट.
घामेजलेलं अंग जीव पाणी-पाणी.
डोईवर संसार त्यांचा,
डोळ्यासमोर काळाकुट्ट अंधार,
नाही बघवत त्याचे हाल कुत्र्यावाणी.
तप्त उन्हातून चालतेयं,
कित्येक कोस, माय लेकुरवाळी,
पोट उपाशी आणि लेकरे कडेवरी.
डोक्यात शेकडो विचार,
प्रवास केवळ जगण्यापायी,
घेऊनी दुखाच बिऱ्हाड डोईवरी.
मैलोनमैल तुडवत पायदळी.
कुणी मरती अपघाताने,
कुणी भीतीने, भुकेने मरत आहे.
रस्त्या वरच्या मरणाची त्यांच्या,
नाही किव, ना कणव असे कुणा,
दु:खाने त्यांचे मुलबाळ रडत आहे.
पोटात नाही घास जीव व्याकुळला,
निसर्गाने कसा घाला हा घातला.
मानव मारण्या कोरोना आला आहे,
नर्स, डॉक्टर आता देव तो बनला.
धडपडतोय जगण्या तिथे,
अजुनी मानवता शिल्लक आहे.

✍ **प्रतिक मुंजेवार**

जरा जपून वागा

लाँकडाऊननी तूम्ही फक्त
थांबलाय घरात पण
कूणाची तरी,
चूलच थांबली आहे कायमची.

पण, लाँकडाऊन असले म्हणून,
पोटातल्या भूकेला
कूलुप लावता येत नाही.
म्हणून म्हटलं,
तूमच्या जवळच्या ढिगभरातून
दिलेत जर मूठभर,
तर, कोणीतरी जेवेल पोटभर.

आज हसाल,
घोळका करुन
चौकाचौकात खूशाल बसाल.
पोलिसांची गाडी पाहून
गल्लीत जावून लपाल.

त्यांचे काय,
ते कर्तव्य म्हणून समजावतिल,
दोन हंटर मारुन
कदाचित् सोडूनही देतील.

पण जर कोरोनाने
मारली मगरमिठी तुम्हाला
एखाद्या घोळक्यात खूशाल.
तर मग थेट मृत्यूच्या
अंधारलेल्या गुहेत जावून
कायमचे अदृश्य व्हाल.

✍ **शितल गोविंदवार**

स्थलांतरीत

सुटलेला धीरं, अनं फुटलेले पायं
तान्ह्या लेकरासवे, चाले अनवाणी मायं

भरंभरं चाल पोरा, दुर हाय लई गावं
काळ आहे पाठीमागं, कधी गाठल काय ठावं

अर्धपोटी पोरंबारं, चाले मायबापासंग
अनं तुमची लेकरं, मस्त खाण्यातरे दंग

बंद झाला कारखाणा, झाले लाखो सैरभरं
अंगी नाही त्राण काही, कसे होऊ आत्मनिर्भर

काही वाटेतच गेले, मेले रेलखाली काही
आम्ही नव्हतो सेलिब्रिटी, किवं कुणी केली नाही

आले विमाणाने घरी, जे होते दुरदेशी
साधी एसटीपण मिळेणा, येथे आम्हा सारख्याशी

फक्त नावालाच आहे, आम्ही सारे भारतीय
वागणूक मिळे आम्हा, जसे आहो परकीय

नको कुणाच्या वाट्याला, असे स्थलांतरीतांचे जिणे
मरण आहे सोपे पणं, जगणे किती जिवघेणे

✍ **संतोष डाखरे**

लढा

मी कुठलेच आता, गीत गात नाही,
शब्दांना हवी ती, उरली बात नाही.

करतोय वार, नकळत कोरोना,
औषध तयाचे, या जगात नाही.

विलग राहून, चैन तोडू त्याची,
वार करण्यास, त्याला हात नाही.

होऊ आता सज्ज, दोन हात करण्या,
कोरोनावर अजून, केली मात नाही.

मशाल घेता लढू, कोरोनाचा लढा,
उजेड देण्या आता, उरली वात नाही.

सुरू मदत खरी, माणुसकीच्या नात्याने,
ना धर्म ओळखीचा, ना कुठली जात नाही.

डॉक्टर पोलीस, धजताय यंत्रणा,
दिन कुठे सुखाचा, उरली रात नाही.

तोडण्या साखळी, पाळू या एकांत,
गर्दीत माणसाच्या, माणूस जात नाही.

✍ **कमलेश सोनकुसळे**

हिन्दी विभाग

लॉकडाउन

तुमने कहा
लॉकडाउन चल रहा
मैंने भी यह मान लिया.
लेकिन,
एक वर्दीवाला फ़ौजी था.
देश को महफूज रखना था.
प्रण ऐसा कठोर था.
लॉक डाउन का ना असर था.
था बेटी को वचन दिया,
जल्दी ही घर आने का.
आया लिपटके तिरंगे को,
शहीद हो गया मातृभूमि को.
बंदूक से निकली गोलियों ने,
लॉकडाउन को तोड़ा था.
परिजनों को रुलाया था.
वीरगती उसे सुलाया था.

तुमने कहा,
बाहर मौत मंडरा रहीं
घर में ही रहना महफूज हैं
लॉक डाउन चल रहा.
मैंने भी मान लिया.
नींद ना आती खाली पेट.
पर उस रात आ गइ कम्बख़्त.
और अचानक,
सांसे मद्धम हो चली,
आँखे भी अब जलने लगी.
शोर ने जगाया था,
कंपनी में गैस रिसने लगा.
तुमने कहा था लॉकडाउन है,
गैस ने लॉकडाउन तोड़ा था.
कितनों को रुलाया था.
मौत की नींद सुलाया था.

तुमने कहा,
लॉकडाउन चल रहा.
मैंने भी यह मान लिया.

काम काज सब बंद था.
भूखा पेट रोज मरता था.
नींद भी कहां आती थी?
सपने में रोटी दिखती थी.
सोचा अपने गांव चलू,
नहीं गर 'बस', तो पांव चलू.
परिवार मुझे पुकारता था.
बस, साथ जीना मरना था.
मैं एक दिन फिर चल पड़ा
गांव की ओर निकल पड़ा.
पटरी पटरी चलता था.
थक के वही सो जाता था.
गांव को नजदीक पाता था.
मन ही मन इतराता था.
तुम्हीं ने कहा लॉकडाउन हैं.
मालगाडी ने लॉकडाउन तोड़ा था.
कितनों को कुचला था.
मैं भी पहियों में रौंदा गया.
मौत की बाहों में समा गया.

तुमने कहा था,
लॉकडाउन चल रहा.
और मैंने भी यह मान लिया.
पर मौत?
मौत को कहा होता हैं
लॉकडाउन...!

✍ **सविता देवगीरकर**

कौन रखे हिसाब?

मंजर अजीब देखे
तेरे शहर में,
पत्थर के लोग मिले
शीशे के घर में.

छीपे घावों को लेके
भटक रहे है,
पर कोई ना शामिल हूआ
हमारे दर्द में.

भुख बीमारी से बड़ी है
ये किसे समझाए?
चूल्हे कब से जले नही
हमारे घर में.

चलते चलते छाले पड़ गये
ग़रीब के पांव में,
जो अमीर है वापस आ रहा है
हवाई जहाज़ में.

बीमारी से कितने मर गये
हिसाब है सरकार के पास,
कौन रखें हिसाब?
मजदूर जो मर गया रस्ते में.

✍ **नरेंद्र गाडगे**

कटिबद्ध हैं हम

खौफ एवं दहशत का
कोरोना हैं दुसरा नाम,
यह महामारी फैलाना
उसीका तो हैं काम.

महामारी ऐसी विकाराल
कि कभी देखी ना सुनी,
शायद हमें सबक सिखाने की
धरती मां ने हैं ठानी.

निरंतर दोहन का उसने
पलटवार ऐसा किया कि,
करोना के साये में मानव
डर-डर के हर पल जिया.

मानो बोली मुर्ख मनुज,
न चलना आका बनने मेरे,
अब भी जागो वरना तुम्हे
घेरेंगे संकट कई गहरे.

धरती मां, हम नादान आज
क्षमाप्रार्थी हैं आपके,
भुगत चुके कटू फल
पूर्व में किये पाप के.

हृदय की गहराई से
पश्चातापदग्ध हैं हम,
पर्यावरण सुरक्षा हेतु
कटीबद्ध भी हैं हम.

सृष्टी में सुदूर तक
हरीतिमा बिछा देंगे,
करोनाग्रस्त की मदद में
तनमन से जुट जायेंगे.

कडी मेहनत कर दवाई
अधिकाधिक बनाएंगे,
देश तो क्या विश्व से ही
इस बला को भगाएंगे.

वसुधैव कुटुंबकम का अर्थ
दुनिया को समझाएंगे,
हमारी संस्कृती के संस्कार
सारे ही देश अपनाएंगे

✍ **आरती कुलकर्णी**

द्वंद्व

कितना खामोश है सब,
लग रहा सूनसान सा.
ना रहा सूनसान सा,
तो हो जाएगा शमशान सा.
आसान नहीं है ऐसे जिना,
सब जानते है.
सब्र और संयम ही है
हथियार इस वक्त.
जो ठहर गया तो जीवन.
जो ना रुका तो,
सब होगा समशान सा.
अस्तव्यस्त सी हो गाई है राहें.
साथ जी उठेंगे फिर अगर हम चाहें.
क्या कष्ट है अपनों के साथ रहना?
भूल गया है इंसान कितना कुछ कहना.
फिर मिला है मौका जी लो अपनों के साथ.
गलत या सही,
कह दो कुछ बातें अनकही.
फिर चला गया तो
क्या पता ना लौटे.
जिंदगी की जरूरत
अब सिर्फ रोटी ही नहीं.
यही भुलभुलैया जिंदगी का छंद है.
मानो या ना मानो,
जीवन एक द्वंद्व हैं.

✍ **सिद्धार्थ स्वर्णकार**

हम खड़े है अभी ढले नहीं

ये तेरा कहर है,
या आरजू है तेरी.
सहम गया हर इंसान,
बढ़ गई आपस में दूरी.

शक की फैली बिमारी,
पर कोई किससे रुठा नहीं.
बस हुए थोड़े फासले,
पर कोई नाता टूटा नहीं.

सफर हो गया खत्म,
पर रास्ता कटा नहीं.
निकला मंजिल-ए-चाह,
पर थम गया वही का वही.

हो गए थोड़े विचलित,
पर अभी हम भटके नहीं.
लडेंगे फीर से डटकर,
हम खड़े है अभी ढले नहीं.

✍ **गजानन देशमुख**

विरासत

जब ना संभाल सके उसकी दी
विरासत उपहार को हम.
अब वो जिम्मेदारी स्वयं उठा रही हैं.
वो हैं पृथ्वी धरती माँ हमारी दोस्तों
जो अपने नालायक बच्चो को,
अपने तरके से सबक सखा रही हैं.

देखो! बह रही हैं अब, सरिता की निर्मल धारा
हवाओं से दूर हुआ है दूषण सारा.
प्रकृती भी अब मंद-मंद मुस्कुरा रही हैं.
जो अपने नालायक बच्चो को,
अपने तरके से सबक सखा रही हैं.

सोचते थे जिनके बिना नहीं हो सकता
पल भर भी गुजारा.
जी रहे ह हम खुशी-खुशी उन चीज के बिना.
बात ये पते की और सच्ची समझा रही है.
जो अपने नालायक बच्चो को,
अपने तरके से सबक सखा रही हैं.

भूल गए थे हम जाने
कब से कैदे अहसास को.
कितनी कीमती है जिंदगी,
मौत जिसको हरा रह हैं.
समझो अब तो जो
प्रकृति हमें चेता रही हैं.

आजादी की किमत हमें
वो हर पल समझा रह हैं.
वो हैं पृथ्वी धरती माँ हमारी दोस्तों
जो अपने नालायक बच्चो को,
अपने तरके से सबक सखा रही हैं.

✍ **पूजा उजवणे**

कोरोना: एक परिवर्तीत दृष्टीकोण

कोरोना की भयावहता,
देखी हमने, तुमने सबने.
कोई रोड पर ना निकले,
कहे मोदी जी अपने संबोधन में.

दुनिया बदल गई है,
इस सूक्ष्म जीव से.
बदल रही है जिंदगियां,
कोरोना के प्रभाव से.

संकट में ही संकेत है,
कह गए विद्वान सुजान.
तू अपनी तकलीफों में,
इन्हें जान पहचान.

इस बदले परिपेक्ष में,
बदलना है दृष्टिकोण.
कोरोना चीख-चीख कर कह रहा,
ना रोको, ना रोको, ना रोको.

ना रोको तुम पशु-पक्षी के शुभ विचरण को.
ना रोको तुम जंगल के बढ़ते कद को.
ना रोको तुम समुद्र के विराट तट को.
ना रोको तुम नदीयो के र्नमिल जल को.
ना रोको तुम पवन के पावन वेग को.
ना रोको तुम आसमां के नीले रंग को.
ना रोको तुम सूरज-चांद में नीज तेज को.
ना रोको तुम प्रेम रस सी प्रकृती बहार को.
ना रोको तुम पतझड़, बाररश की फुहार को.
ना रोको तुम पृथ्वी मां की कोमलता को.
ना रोको तुम जगत पिता के अनुशासन को.
ना रोको तुम जनमानस की मानवता को.

अभी तो कोरोना ने केवल रोका है हमें,
अब भी ना रुके, ना संभले तो,
समूल नष्ट हो जाएंगे, डायनासोर की तरह.

घरों में रुके हैं तो सोचे जरा,
क्या पाना था, क्या पाया है।

जो पाया है, क्या वो भाया है?

कोरोना दे रहा चेतावनी हमें,
ना रोको, ना छेड़ो,
ईश्वर के जीवन चक्र को.
फल पाने, सींचे केवल जड़ को.
करें तन मन से संतुलित खुद को.

✍ **ऋषिकुमार अग्रवाल**

ना हो तु करोना से निराश

ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश,
ना हो तु करोना से उदास,
ये जिंदगी हैं जिंदगी,
यु ही गुजर जायेगी,
हंसते- हंसाते! हं

फिये से नया सुरज उगेगा,
कमल भी खूब खिलेगा,
फुलो की सुगंध महकेगी,
जब बहारो से बहार होगी.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

सुबह का सुहाना मंजर,
फिर से दिखेगा बाग-बागीचो में,
कोयाल की कुहू-कुहू,
फिर से गुंजेगी गगन में.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

जिंदगी फिर से पटरी पर आयेगी,
धीरे-धीरे फिर रफ्तार पकडेगी,
बहारे फिर से खिल जायेगी,
जिंदगी फिर से हसीन बन जायेगी.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

बाजार भी खुलेंगे,
रौनक भी छा जायेगी,
दुकाने भी फिर सज जायेंगी,
नजारा होगा गुलशन सा,
मास्तिया फिर से छा जायेंगी.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

बस ये जिंदगी ऐसी ही होती हैं,
ऐसी ही चलती रहती हैं,
कभी उपर कभी नीचे होती हैं,

इसी का नाम जिंदगी हैं.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

हाथ न मिलाये नमस्ते करिये,
थोडा-थोडा दूर होकार बाते करिये,
हाथ अपने धोते रहिये,
भीड-भाड में मत जाईये.
ना हो तु करोना से निराश,
ना हो तु करोना से हताश.

✍ **संजय जोशी**

एक आस

इन बंदिशो से आस लगाये बैठे हैं,
खुली हवाओ की,
इन बंदिशो से आस लगाये बैठे हैं,
खुले आसमान की,
इन चार दिवारो से आस लगाये बैठे हैं,
फिर से चार यार मिलने की,
और...
जमाने से आस लगाये बैठे हैं
करोना को हाराने की!

मुक्त गगन की बेलाओ को,
कुछ रुकावट सी मिल गई हैं.
इन स्वच्छंदसी हवाओ में,
एक मजबूरी सी छा गई हैं.
पर हर बार घोर अंधेरे से,
भी उबर आने की,
रीत रही हैं अपनी.
इसलिये...
एक किरण से आस लगाये बैठे हैं,
आशा के सुरज की.
उस 'सफेद वर्दी' से आस लगाये बैठे हैं,
हर एक के जीवन ज्योत की!

कभी-कभी सोचती हुं,
मुद्दत से आरजू थी,
की फुरसत मिले.
पर अब मिली तो इस शर्त पर,
की किसीसे ना मिले.
खाली सडके देखकर,
हर बार जेहन में सवाल हैं.
जो सडको पर ही बसते थे कभी,
उनका भला क्या हाल हैं?

अब रास्तो-गालियो में भी,
हलचल नजर नही आती.
विराण पडा हैं सारा जहां,
क्योंकी एस महामारी से निपटने,
खुद वर्दी में खडा हैं भगवान हर जगह.

जैसे हमेशा की तरह,
बवंडर से भी निकाल आने की,
आदत रही हैं हम सबकी.
एस बार तो लडाई घर बैठे ही जितनी हैं.
इसलिये तो,
फिर सबकुछ पहले जैसा होगा,
मन में यर भरोसा लिये बैठे हैं,
हम फिर एक बार जीत के दिखाएंगे
ये विश्वास टीकाये बैठे हैं.

✍ **वेदश्री बारोकर**

एक प्याली चाय

फसे हैं इस कदर मुश्कील में,
के घर में ही कैद हो गये,
टहलने को ठिकाने थे कई सारे,
पल भर में सारे के सारे बरबाद हो गये.

घुमा करते कभी शहर,
घुमे कभी कोना-कोना गली का,
अब तो बस नापते हैं,
कोने से कोना अपने ही घर का.

अहमियत तो कई चिजो,
की हुआ करती थी जिंदगी में,
अब तो दो वक्त की रोटी खाओ,
और सारा समय बिताओ घर में.

फिक्र तो अपनो की सदा करते हैं,
मगर अब तो रहा ही नहीं जाता हैं,
पुछ ही लेते हैं "तुम जहा हो ठीक तो हो?"
तुम्हे कुछ ना हो हम दुआ करते हैं.

न जाने कब इससे आजादी मिलेगी,
जायेंगे खुलकर, न कोई फिक्र होगी,
फिर वही दिन, वही दोस्त होंगे,
और बस चाय की प्याली होगी.

✍ **कस्तुरी दाणी**

है सामना

है सामना अब विश्व का
अपने प्रति रक्षार्थ मे.
अपने ही मन को मारकर,
चल पड़े दूसरो को तारने.
है कर्तव्य पथ इतना धूमिल
की त्याग दी इंसानियत.
है डर रहा इन्सान यहा,
इस वक्त इंसान से.
यदि गिर पड़ा कोई
पथिक अपनी राह पे,
चाहकर भी न देगा सहारा
"संक्रमण के प्रभाव "से.
दिन दिहाड़ी करता-करता
बेचारा, एक श्रमिक,
कभी धूप तो कभी छाव मे.
किंतु कर दिया फिर भी अलग
इस व्यवस्था के द्वार ने.
किस ने बोया यह बीज आपातकाल मे.
है मरते लाखो यहा वृद्ध भूख,
और बच्चे दूध की प्यास मे,
फिर भी अनजान है लोग
यहा गरीबो के अभाव से.
आ ही गई सामने
यातना इस संसार की,
कोई नही गरीब लाचार का.
सुनी गलिया सुना गलियारा,
मात्-पिता का एक ही तारा,
चल दिया अब घर को
एक दिन वह सोचते,
फिर भी उसके राह पर
पावो के छाले रोकते.
एक तरफ मां बाप का घर
पर, मंदी का प्रहार है
उपर से तीनो के बीच
"कोरोना "रूपी द्वार है।

✍ **कार्तिक तिवारी**

मैं मज़दूर हूँ

मैं मज़दूर हूँ,
अपने घर से अब भी थोड़ा दूर हूँ.

भीख नहीं चाहीएँ साहब,
भले ही भुखे पेट ज़रूर हूँ.
पर बीवी-बच्चों का दुख
अब देखा नहीं जाता
बाप हूँ ना, मजबूर हूँ.

किसी मदद की उम्मीद नहीं हैं आपसे,
बस, घर जाने से मत रोको.
मैंने ही बनाया था वो रास्ता,
जो तपतीं धूप में नाप रहा हूँ अब.
पैदल ही सहीं, पहुँच जाउँगा.
आख़ीर मेहनत करने के लिए ही तो मशहूर हूँ.

उन्होंने पाँव धोये थे मेरे,
मेरा वोट जो चाहिएँ था.
फिर गायेंगे मेरा गुणगान,
मेरी महानता के जुमले कसेंगे,
अभी काहे चिंता करेंगे मेरी.
चुनाव के हिसाब से अभी ना-ज़रूर हूँ.

जिनके कुत्ते भी हवाईजहाज़ में लाये गये वापस.
वो अमीर हँसते हैं मुझपे.
कहते हैं कि ये तो जन्म से ही नालायक हैं.
मैनें भी पढ़ना चाहा, बढ़ना चाहा
मौक़ा दो, तो क्षमता भी हैं मुझमें, मेरे बच्चों में
बस कभी ग़रीबी, कभी बेरोज़गारी से मजबूर हूँ.

बच्चों की पढ़ाई की ख़ातिर, उनकी भलाई के लिये
दिन-रात खटता हूँ, टूटता हूँ.
क्या पाप हो गया कोई?
उनके सुनहरे कल के ख़ातिर,
झगड़ते हैं अपने मुश्किल आज से हम.
कोई गुनाह कर दिया, मालिक?
क्यूँ पिढीयों तक ग़रीबी सहे कोई?
बावजूद इसके कि बेक़सूर हूँ.

फिर लौटकर आऊँगा वापिस.

जब आपका डर खत्म हो जाये.
फिर बोझा ढोऊँगा, सिलूँगा कपड़े आपके,
और दमकाऊँगा चमचमाते गहने भी.
बस अभी कुछ दिनों के लिये जाने दो वापस.
अपने गाँव, अपनों के बीच.
क्योंकि आपके बड़े-बड़े विकसित सपनों में,
मैं लाश के तौर पे भी नामंज़ूर हूँ.
मैं मज़दूर हूँ
अपने घर से अब भी थोड़ा दूर हूँ.

✍ **चिन्मय गोतमारे**

ENGLISH SECTION

Emotions during Corona Outbreak

Oh, here comes Mr Worldwide!
Without the need of any guide.
With a crown in round,
It is ruling all around.

First in Asian,
Then in European.
Corona in association,
People in isolation.

A large family of viruses,
In humans are diseases.
Washing hands everyone,
Staying away from each one.

Industries and shops are shut down,
Colleges and schools are closed down,
Everywhere is a lockdown,
Economy is falling down.

Death and death everywhere,
Found no drug anywhere.
Fear and difficulty here,
Terror and anxiety in atmosphere.

Workplace shifted,
Lifestyle converted,
Routine changed,
Everything exchanged.

Why do you follow us?
Why don't you leave us?
O, Lord! Save us
From this trouble.

✍ **Litty Curian**

King Corona! King Corona!

King Corona! King Corona!
From where you came?
Mother Nature or China
Whom should we blame?

Are you God?
Or you are a devil.
Are you here to save the earth?
Or to do something evil.

Are you the warrior?
Sent to save nature.
Or you are the moron,
Came to destroy our future.

King Corona! King Corona!
Please stop harming.
Now I came to know,
For what you are craving.

We became careless
While fulfilling our greed.
And you are the result
Of these evil deeds.

Yes, I do agree!
We harmed Mother Earth
And that is the reason
Behind your birth.

✍ **Shravani Surve**

Sensation of Lockdown

The country is lockdown, not you,
The city is lockdown, not your life.

Parks are banned not nature,
Malls are banned not custom.

Gyms are closed not your fitness,
Theatres are closed not your vision.

Live lectures are restricted not E-learning,
Social gatherings are banned not a crackdown.

Roads are empty without any noise,
Earth will be cured without any wear and tear.

No more social gatherings and crowd,
The Universe will always be proud.

No more issues, No more crime,
The world is full of Amazon and Prime.

Go safe with all the hidden grace.
Next, some days make a better place.

✍ **Suprit Bagawale**

Meet me in the Ordinary

During this isolation period of
Lockdown and quarantine
I want you to find me like
A treasure on a bookshelf,
A million to choose from,
Other standing taller beside me,
Newer and brighter than me,
Your finger glides along the
Dusty shelf until you search me,
Tilt me towards you,
Run your finger down my spine,
Brush my pages between your thumbs,
Open me up, read every word of me,
From beginning to end,
Take your time to read between my lines,
And absorb every ink-stained spot,
Read me until you fall asleep
With me laying across your chest,
Re-read your favourite parts of me,
Recite the words that sink into your soul,
Hold onto me and bend my corners,
Return to me on rainy nights,
Let me fill you with adventure and fantasies
That you never dreamed of before,
Read my pages out loud to me
So I can hear your voice and laughter,
And when you get my last page,
Tell me how you'd continue the story,
Tell me the ever after of you and me.

✍ **Diksha Gurbaxani**

Corona A New Dawn

Don't they say united we stand,
Divided we fall
But it's not true,
To live, we need to stay inside our walls for now.

It's not a moment
For thou to wander
Sit inside tickle your
Mind and wonder.

Because Corona is
The new calamity
All it requires is
The isolated integrity.

Even the darkest
Night has sunrise,
One day Corona will fall
And the new dawn will rise.

Let's salute to doctors,
Police and all
Who is standing between
Us and Corona as a wall.

Let's consider this
Cliché from within
Divided we stay,
United we win.

✍ **Rima Thakur**

Pandemic

Oh, it happened again after 1920
This time it's a Corona
Rather than a flu
Chinese material everywhere we find
Like a gun to glue

Though the worst disaster
But it's a hidden wish
As whale in Pacific
Wishes for sardine fish
For that mother to a holster kid
Dad wanted to share the feast

As grand *Paa* & *Maa* long back did
Full family fighting with
The gigantic beast
Cracking jokes together
Then money to invest
It's time to spend from the treasure chest

Have you found news of increasing case?
But yes, yesterday
There was the headline of gang rape
To those demons who are hells to the human race
Still hungry not for
Food but "Yes" for the body shape

Two words of sympathy
For the man who is sick
Offer him at least *Kadak Chai*
Requesting not to panic
Wash each veg from a store you pick

Story else than snap
With lipstick on Instagram
Conversation too changed
Now greeting by "Namaste & Salam"

Okay, let me end it now
It's the last appeal
Where the world dealing with the disease
Be the one who brings
The smile on someone's face at least

✍ **Hritika Hisariya**

आणखी काही कविता...

बहिष्कार

बरं झालं कोरोना तू आलास.
तुझ्यामुळंच कळला
या तरुण पिढीला
बहिष्काराचा अर्थ!
आजपर्यंत केवळ पुस्तकात, कथेत
वाचला होता 'बहिष्कार',
दाहकता कळतच नव्हती त्यातली.
आज नुसती शिंक जरी आली तरी
बघतात कोरोनाच्या संदर्भातून
आणि टाकतात बहिष्कार मरण्याच्या भीतीने.
हा केवळ शारीरिक बहिष्कार
तरी एवढा घाबरलास माणसा?
आता तुम्हीच सांगता,
तो जात, धर्म, पंथ मानत नाही म्हणून.
फक्त दिसतो 'माणूस'
त्यासाठीच जपा माणुसकी.
असं आव्हान वगैरे करता तुम्ही.
आमच्या बापजाद्यांनी,
कसा सहन केला असेल पिढीजात कोरोना?
जाणवतात चटके अधून मधून,
पॉजिटिव असन्याचे,
मात्र षंढ मानुस
निमूटपणे बघत राहतो तोंडावर पट्टी बांधून,
निगेटिव असल्यागत,
माणूस आणि माणुसकी विसरून.
बरं झालं कोरोना,
तू आलास.
अश्पृश्यता, माणूस आणि मानवतेची जाणीव झाली.
त्यांना कळला, या निमित्ताने तरी
अर्थ आणि बहिष्काराचा
आणि सामाजिक दुराव्याचा!
पूरे झाल असेल तर
आता निघून जा कोरोना!
काहीही असो,
शेवटी ती माझीच मानसे आहेत,
ती जरी मला आपला मानत नसली तरी...

✍ **सुरेश सोमकुंवर**

खेळ

भुलवत नाही मनाला
येणारा गंधीत वारा
एका विषाणूचा हा
दुषित खेळ सारा

हाकेला 'ओ' नाही
बंद सारी कवाडे
श्वास जरी घेती
दारामागे सांगाडे

असून जवळ तरी
किती अंतरी अंतर
कुपी केवळ देखणी
उडले कधीचे अत्तर

शत्रू जरी सूक्ष्म
ना गंध ना कात
घर भयावह मोठे
त्याचे मनामनात

खेळतो तो; जिंकतो तो
मदमस्त अन हसतो
हा तुझाच डाव मानवा
जाळ्यात तूच फसतो

✍ **भावना देशभ्रतार-धडाडे**

चल, निघूया आपल्या गावास...

चल, निघूया आपल्या गावास आता
जिंदगी शहरातली नावास आता !

ओढले गेलो भुकेने डांबराकडे
फक्त पोकळीचा आभास आता !

पाहिले स्वप्ने कधी माझ्या मनाने
छाटलेली पंख.. हे आवास आता !

वाहनी रस्त्यास मोजिले ना कुणी
मोजण्याचे काम का घावास आता?

का? कशाला थांबायचे आपण इथे
उरली कुठे किंमत.. घामास आता?

काल गेलेली भावंडं चिरडली तिथे
रूळ झाला मरणाचा फास आता !

भर दुपारी चालताना ताई प्रसवली
राहिलाच नाही प्रसवाला त्रास आता !

लाल-हिरव्या रंगांच्या या बातम्या...
निवेदकाचा मस्त झाला दास आता !

ही चकाचक अन् दुहेरी पायवाट
हा एवढाच झाला विकास आता !

बाहेरून कडी लावली मंदिरासही
भीती वाटली असावी देवास आता !

सर्वकाही बंद झाले कुलुपामधे
संपेल ना जीवाचा प्रवास आता !

✍ **रवीन्द्र पानतावणे**

कोरोना काळातील नोंदी...

१.
निर्मनुष्य झालेले रस्ते, लॉकडाऊन झालेली शहरे,
गिरिजाघर, मंदिर, मठ, गुरुद्वारा, मस्जिद
आणि तमाम धार्मिक स्थळांची कवाड बंद करून
सेल्फ क्वारेंटीन्ड झालेली श्रद्धास्थानं.
जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी लागलेल्या रांगा.
सॅनिटायझर्स, टिश्यु पेपर
आणि मास्कसाठी होणाऱ्या हाणामाऱ्या.
बंद झालेली मॉल्स, सिनेमाघरं,
मनोरंजन आणि पर्यटन स्थळं.
अघोषित संचारबंदी, जमावबंदी
आणि घरात अडकून पडण्याची अगतिकता
दर्शवतेय परमोच्च भौतिक सुखाचा चरमबिंदू.

२.
'नेशन्स विद हाईस्ट पर कॅपिटा इन्कम'
ची बिरुदावली मिरवणाऱ्या देशातले लोक,
तरसत आहेत हॉस्पिटल मधल्या एकेका बेडसाठी.
आणि मरताहेत किड्यामुंग्यासारखे.
कुणाला वाचविणे आहे जास्त गरजेचे.
कोण म्हातारा, कोण तरुण,
कोणाच्या जगण्याची आहे जास्त गरज
यावरून ठरवताहेत काही देश आणि हॉस्पिटल्स
रुग्णांवरील उपचाराच्या प्रायोरीटीज.

३.
रोगबाधित असण्याच्या साध्या शंकेनेही
लोक टाकताहेत आपल्याच लोकांना वाळीत.
नाकारताहेत त्यांना त्यांच्याच,
वसाहतीत आणि रहिवासी संकुलांमध्ये प्रवेश.
काही शोधताहेत संधी माल कमाविण्याची.
आणि बसलेत जीवनावश्यक वस्तू
आपल्या बुडाखाली दाबून,
बाजारात कृत्रिम तुटवडा निर्माण करत.

४.
अफवानांही आलयं पीक.
निर्माण होताहेत महामारीतून सुरक्षित रहाण्याचे

नवनवीन उपाय क्षणा-क्षणाला.
नुस्खे, औषधी, मंत्र-तंत्र, जडी-बुटी, टोने-टोटके,
शेण-गोमुत्र वैगेरे देताहेत दाखले रोगबाधित मानसिकतेचे.
सरकार आणि वैद्यकीय यंत्रणा करू पहातेय मात
या आगंतुक महामारीवर हरसंभव प्रयत्न करून.

५.
काही सो-कॉल्ड देशभक्त मात्र
हॉस्पिटलमध्ये क्वारेंटीन्ड असतांनाही
नवरदेवाची वरात घेऊन आल्यागत मागणी
करताहेत सोयी-सुविधांची
आणि पळून जाताहेत हॉस्पिटल्समधून
सोयी-सुविधांच्या अभावांचा हवाला देत.
काही लावताहेत हजेरी सभा-समारंभात.
काही मोबाईल स्वीच-ऑफ करून
खुशाल होताहेत नॉट रिचेबल
आणि फिरताहेत देशभर
महामारीचे अग्रदूत बनून.

६.
ज्या शहरांना उभारण्यात गाळला होता घाम,
त्या शहरांनाच आता नाही त्यांची गरज.
हातच काम अचानक बंद पडलेल्या हवालदिल दिवसात,
टोळधाडीसारखे निघालेत स्थलांतरित लोक
बारकी पोरं कवेत घेऊन
आणि अवघा संसार गाठोड्यात बांधून,
मिळेल त्या दिशेने, दळणवळणांच्या साधनांशिवाय.
कधीही आपला नसणारा गाव जवळ करण्यासाठी.

७.
कुणी गाठू लागलाय आपला गाव,
पाणीपुरीच्या ठेल्यावर आपलं अख्ख बिऱ्हाड लादून,
कुणी घेतलय स्वत:ला दुधाच्या टॅन्कर मध्ये कोंबून,
कुणी झालय बंदिस्त कंटेनर अन सिमेंट-मिक्सरमध्ये,
कुणी मैलोनमैल प्रवास करतोय ट्रकला लटकून,
कुणी सायकलवर, कुणी मोटर सायकलवर,
कुणी रिक्षावर तर कुणी पायीच गाठू लागलाय
शेकडो मैलांचा पल्ला बॉटलभर पाणी, चार-दोन केळी
आणि बिस्कीटच्या एखाद-दुसऱ्या पॅकेटच्या सहाय्याने,
उन्हा-पावसात वनवन करत.

पण नाहीच शाश्वती
कोण आधी करेल जवळ याची
आपुला गाव की मरणाचा डाव?

८.
काही जागी प्रशासन,
तर काही जागी दयावंत
पुरवताहेत चतकोर भाकर.
मदत कार्याच्या फोटोंचा आलाय पूर
इंस्टाग्राम, ट्विटर, आणि फेसबुक अकॉउंटवर.
गावोगावीच्या वेशींवर केली गेली जातेय
औषधीयुक्त फवारणी निर्जंतुकीकरणाच्या नावावर.
काही जागी मिडीया आहेच सोबतीला,
ब्रेकींग न्युजच्या शोधात कोरडे सांत्वन करत.
नसलच काही तरी लॉकडाऊनच्या या काळात
परिस्थिती आणि व्यवस्थेचा मार
आणि पोलिसांची लाठी आहेच ढुंगणावर वळ उमटवत.

९.
केली जाते एखाद्या व्यक्तिच्या
मोठं असण्याची आणि चांगुलपणाची कल्पना,
त्याच्या अंतिम संस्काराला
जमलेल्या लोकांच्या गर्दीवरून.
एकेकाचं जन्मभराच संचित असतं ते.
पण आप्तस्वकियांविना प्रशासनाच्या
यांत्रिक साथीने दफन होतांना
जिंदगीभर 'आप कतार में हैं' स्टाईलने
जगलेला जीव होत आहे केविलवाणा,
स्मशानभूमितील वेटींग लिस्ट पाहून.
आणि मरण पावलेल्या जिवलगाला
अंतिम निरोपही देता येवू नये
यापेक्षा काय असू शकतं मोठ दु:ख.

१०.
प्रकृतिही होतेय रीबूट स्मार्टफोनसारखी,
व्हेनिसचं पाणी दिसायला लागलयं,
पुन्हा एकदा नितळ, सुंदर, स्वच्छ आणि निळशार,
अव्याहत वाहाणाऱ्या पर्यटक बोटींच्या
वर्दळीपासून उसंत घेत.
जलचर विचरण करताहेत पृष्टभागावर

आरपार गाठता येतोय पाण्याचा तळ नजरेतून
सूर्यकिरणांच्या साक्षीने.
जागोजागीच्या निसर्गरम्य स्थळांची
आणि अभयारण्यांची आहे तीच स्थिती
वसुंधरा घेतेय मोकळा श्वास जरावेळ
भौतिक उपभोगाच्या किळसवाण्या मानवी मिठीतून...

✍ **सावन धर्मपुरीवार**

कंटाळवाण्या एकांतवासात

कंटाळवाण्या एकांतवासात
खपल्या काढाव्यात वेळेच्या
निर्जन रस्त्यासारखे
आपण भासतो सुनसान, भकास
गुदमरणाऱ्या श्वासांचे
जुळवीत बसतो गणित
आणि बोलतो स्वतः च स्वतः शी
मंत्र भारणाऱ्या मंत्रिकासारखे
मनातल्या मनात.
कुलूपबंद आठवणींच्या जुनाट वह्या
खिल्ली उडवित असतात आयुष्याची
एक एक जीर्ण विखुरलेली आठवण
कुरतडून टाकते काळीज
आणि चेहऱ्यावर दगडी भाव उमटतात.
पाषाणछटानी अंग गोंदवले जाते
निशब्द आकांत उधळत राहतो
बेलगाम घोड्यासारखा.
या रहस्यमयी दिवसाचा
आखूड हात पोहचू बघतो
मनुष्यरूपी पुतळ्याजवळ
अन पुन्हा शिसारी येते
या एकांताची.

✍ **गिरीश सपाटे**

Drawing By: Pushpa Choure (B.A. Part II)

Drawing By: Shraddha Raut (B.A. Part III)

E-book

VERSES DURING LOCKDOWN

E-book created in India by

AAKAR PUBLICATIONS, NAGPUR

ISBN: 978-81-944165-4-8

Copyright © 2020: Principal, Vidyasagar Kala Mahavidyalaya

Price: 200/-